www.rajdand.com
सातारा मंगळवार
२७. २. २०२४
पृष्ठ ४ ! मुल्य ४ !
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९
२५ वर्षे विश्वासार्हतेची

## महत्त्वाचे

### आशा सेविकांच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक : अजित पवार

**मुंबई :** मुंबईतील आझाद मैदान येथे विविध मागण्यांसाठी आंदोलन पुकारलेल्या आशा सेविकांच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

विरोधी पक्षनेते विजय वडेट्टिवार यांनी विधानसभेमध्ये याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होते. त्यास उत्तर देताना उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, शासन आशा सेविकांच्या मागण्यांबाबत सकारात्मक आहे.

आंदोलकांनी सहकार्याची भूमिका घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. चर्चा करून आशा सेविकांचे प्रश्न सोडवले जातील, असेही उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सांगितले.

# मनोज जरांगेंनी आमरण उपोषण घेतले मागे; उद्यापासून साखळी उपोषण

**मुंबई** मराठा आरक्षणासंबंधी जीआर काढल्यानंतर असमाधानी असलेल्या मनोज जरांगे पाटील यांनी १० फेब्रुवारी रोजी पुन्हा एकदा बेमुदत उपोषणाची घोषणा केली होती. यानंतर सरकारने मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देऊनही मनोज जरांगेंनी उपोषण मागे घेण्यास नकार दिला. याउलट ते अधिक आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर उलटसुलट आरोप केले. त्यामुळे सत्ताधारी पक्षातील नेत्यांनी जरांगेंना चांगलेच धारेवर धरले. यानंतर आज उपोषणाच्या सतराव्या दिवशी जरांगेंनी आपलं आमरण उपोषण मागे घेण्याची घोषणा केली आहे. तर उद्यापासून धरणे आणि साखळी उपोषण करण्याचे आवाहन त्यांनी मराठा बांधवांना केले आहे.



मनोज जरांगे पाटील यांनी उपचार घेण्याची तयारी दाखवली आहे. हॉस्पिटलमध्ये दोन दिवस उपचार घेऊन त्यानंतर दोन-तीन दिवसांनी ते पुन्हा महाराष्ट्र दौरा करणार आहेत. सरकारने काढलेल्या अधिसूचनेची अंमलबजावणी करावी यासाठी ते पुन्हा एकदा उपोषणाला बसले होते. मात्र, सरकारने अद्याप काही निर्णय न घेताच त्यांनी आंदोलन मागे घेतले आहे.

अंबडमध्ये संचारबंदी लागू केल्याने लोकांना त्यांना भेटणे कठीण झाले आहे. त्यामुळे आता मराठा बांधवांच्या भेटी घेण्यासाठी ते स्वत: जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं आहे. यासाठीच त्यांनी उपोषण मागे घेत असल्याची घोषणा केली. गावातील मराठा भगिनींच्या हातून रस पिऊन ते उपोषण मागे घेणार आहेत. आंदोलनाची पुढची दिशा ते लवकरच जाहीर करणार आहेत.

काल नेमकं काय घडले?

मनोज जरांगे काल अत्यंत आक्रमक झाले होते व त्यांनी देवेंद्र फडणवीसांवर गंभीर आरोप केले होते. सरकारचा मला मारण्याचा प्रयत्न आहे, माझा बळी घ्यायचा असेल तर मी सागर बंगल्यावर येतो, तिथे घ्या, असं जरांगे म्हणाले होते. त्यांच्या या आक्रमकपणामुळे मराठा बांधवांनीही त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला. तर दुसरीकडे राज्यात एसटी जाळण्याचे प्रकार घडले. त्यामुळे अंबडमध्ये रात्री १ वाजता संचारबंदी लागू करण्यात आली होती. शिवाय छ. संभाजीनगर, जालना, बीड या जिल्ह्यांमध्ये इंटरनेट, एसटी सेवा बंद करण्यात आली. अखेर जरांगे पाटील यांनी सामोपचाराची भूमिका घेतली आणि फडणवीसांच्या सागर बंगल्याकडे जाण्याचे टाळले. त्यानंतर ते अंतरवली सराटी गावामध्ये परत आले होते.

## शिवसेना १८ जागांवर दावा करणार, खासदारांच्या बैठकीत झाले एकमत


**मुंबई** - आगामी लोकसभा निवडणुकीसाठीशिवसेनापक्षाकडून १८ जागांवर दावा करण्याचे निश्चित करण्यात आल्याची माहिती पक्षातील सूत्रांकडून देण्यात आली आहे. यासंदर्भात आज वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीत एकमत झाले असून याबाबत लवकरच अधिकृत घोषणा केली जाणार आहे. दरम्यान, जागावाटपाची चर्चा आणि अधिकार पक्षाचे मुख्य नेते मुख्यमंत्रीएकनाथ शिंदेयांच्याकडे सोपविण्याचा प्रस्ताव या बैठकीत मंजूर करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी लोकमतला दिली.२०१९ ला शिवसेनेने २२ जागा जिंकल्या होत्या आता १८ जागांवर उम्मेदवार तयारी सुरु करणार असून उरलेल्या ४ जागांचे भविष्य एकनाथ शिंदे ठरवतील, असे अधिकार संसदीय दलाने त्यांना दिले आहेत. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरशिवसेनापक्षातील खासदार आणि पक्षातील पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक आज वर्षा निवासस्थानी पार पडली. या बैठकीत वरील निर्णय घेण्यात आल्याची माहिती पक्षातील सूत्रांकडून देण्यात आली आहे. यात लोकसभा आणि राज्यसभेचे खासदार उपस्थित होते.या बैठकीत इतरही अनेक मुद्यांवर चर्चा करण्यात आली असून या बैठकीत आगामी लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी विशेष समिती बनविण्याचा निर्णयावरही शिक्कामोर्तब करण्यात आला आहे. निवडणूक काळात करण्यात येणाऱ्या प्रचारात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या कारकिर्दीत केलेली विकासाची कामे सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे प्रमुख उद्दिष्टे असणार आहे. त्याशिवाय मराठा आरक्षणाबाबत घेतलेला निर्णय, इतर महामंडळांची केलेली घोषणा आणि शिवडी नाव्हाशेवा सारखी अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्पांची केलेली घोषणा हे यंदाच्या प्रचाराचे प्रमुख मुद्दे निश्चित करण्यात आले आहे. याशिवाय यंदाच्या प्रचारात पक्षाकडून पुन्हा एकदा हिंदुत्वावर भर देण्याचे ठरविण्यात आले असल्याची माहिती शिवसेनेच्या खासदारांकडून देण्यात आली आहे.

यावेळी सर्व उम्मेदवारांना मित्र पक्षाशी समन्वय बाळगण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले. तसेच अबकी बार ४५ पार करण्याचे लक्ष्य सहकार्याने व समन्वयाने जिंकण्यासाठी नेते व कार्यकर्त्यांना मध्ये समन्वय वाढवा अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या. मुख्य म्हणजे या बैठकीत आगामी लोकसभा निवडणुकीसाठी मुंबईकरिता विशेष समन्वय समिती जाहीर करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार प्रस्तावही मांडण्यात आला आहे. याशिवाय घटक पक्षांसोबत समन्वय साधण्यासाठीही समन्वय समिती असावी, असा प्रस्ताव मांडण्यात आला असून तो सर्वानुमते मंजूर करण्यात आला आहे.

## दूध अनुदान योजना: ५० हजार शेतकऱ्यांच्या खात्यावर चार दिवसांत पैसे

**कोल्हापूर :** राज्य शासनाच्या गायदूधअनुदानासाठीकोल्हापूरजिल्ह्यातील खासगी व मल्टिस्टेटदूधसंघाकडून ९१ हजार ६०१ दूध उत्पादक शेतकऱ्यांची माहिती भरण्यात आली आहे. पण, निकषानुसार केवळ 'गोकूळ' दूध संघाच्या ८१ हजार शेतकऱ्यांची माहिती अपलोड झाली आहे, त्यातील ७ हजार खात्यांची पडताळणी पूर्ण झाली असून, आगामी चार दिवसात उर्वरित खात्यांची पडताळणी होऊन शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे वर्ग करण्यासाठी दुग्ध विभागाचे प्रयत्न सुरू आहेत.

राज्यात गाय दुधाचे उत्पादन वाढले, त्यात पावडर व बटरला भाव नसल्याने खासगी व सहकारी दूध संघांनी दुधाच्या दरात कपात केली. त्यामुळे दूध उत्पादक शेतकरी आर्थिक अरिष्टात सापडला. खासगी दूध संघ तर मनमानी पद्धतीने २२ ते २८ रुपये लीटरने दूध खरेदी करू लागल्याने शेतकरी हवालदिल झाले होते. त्यांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने गाय



दुधाला प्रती लीटर पाच रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला. हे अनुदान ११ जानेवारी ते १० फेब्रुवारी या एक महिन्यासाठीच दिले जाणार होते. त्यासाठी शासनाने ढीगभर अटी घातल्या होत्या.

दहा दिवसांच्या दुधाचे पैसे शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करणे, पशुधन टॅगिंग, आदी अटी घातल्या होत्या. त्यानुसार दहा दिवसांची माहिती दूध संस्थांना भरण्यास सांगितले होते. जिल्ह्यात सहकारी व खासगी दूध संघाकडील गाय दूध उत्पादक शेतकऱ्यांची संख्या सुमारे ९१ हजार ६०१ आहे. त्यापैकी एकट्या 'गोकूळ'कडे ८१ हजार आहे. आतापर्यंत 'गोकूळ'च्या ७ हजार खातेदारांची माहितीची पडताळणी झाली असून, येत्या चार दिवसात उर्वरित खातेदारांची माहितीची पडताळणी होऊन पैसे खात्यावर वर्ग केले जाणार आहेत. 'वारणा'सह इतर दूध संघांनी शेतकऱ्यांची माहिती अपलोड केली असली तरी त्यामध्ये अनेक त्रुटी असल्याने पहिल्या टप्प्यात त्यांच्या दूध उत्पादकांना पैसे मिळण्याची शक्यता धूसर आहे. पद्वारे माहिती भरल्याने निकषांची चाळण लावूनच येते, त्यानंतर दुग्ध विभाग फक्त कॅशलेस व्यवहाराची तपासणी करून अनुदानाचे प्रस्ताव पाठवणार आहे. पहिल्या टप्प्यात ११ जानेवारी ते २० जानेवारी या दहा दिवसातील दुधाचे प्रती लीटर पाच रुपयांप्रमाणे अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग होणार आहे. त्यानंतर दुसऱ्या व तिसऱ्या दहा दिवसातील पैसे जमा केले जाणार आहेत.

## जेष्ठ कामगार नेते डॉ. बाबा आढाव यांचे आझाद मैदानात सोमवारपासून उपोषण सुरू

**मुंबई :** माथाडी अधिनियम, १९६९ सुधारणा विधेयक क्रमांक ३४ हे माथाडी कायदा संपुष्टात आणणारे आहे. शासनाच्या या निर्णयामुळे ८० टक्के माथाडी कामगार बेरोजगार होणार आहे. त्यामुळे सरकारने हा जीआर रद्द करावा, या प्रमुख मागणीसाठी जेष्ठ कामगार नेते डॉ. बाबा आढाव यांच्या प्रमुख उपस्थितीत माजी आमदार नरेंद्र अण्णा पाटील, आमदार शशिकांत शिंदे आझाद मैदानात सोमवारपासून बेमुदत आमरण उपोषणाला बसले आहेत. त्यांना पाठिंबा देण्यासाठी हजारो माथाडी कामगार कार्यकर्त्यांनी आझाद मैदानात धाव घेतली आहे.

# मराठवाड्यात काँग्रेसला खिंडार

## अशोक चव्हाणांपाठोपाठ आणखी एक नेता भाजपाच्या वाटेवर

**धाराशिव :** गेल्या काही दिवसांपासूनकाँग्रेसलाअनेक धक्के बसले आहेत. काही दिवसांपूर्वी माजी खासदार मिलिंद देवरा,माजी आमदार बाबा सिद्दीकी आणि राज्याचे माजी मुख्यमंत्रीअशोक चव्हाणयांनीकाँग्रेससदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. यानंतर आता काँग्रेसला मराठवाड्यात आणखी एक मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसचे प्रदेश कार्याध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री बसवराज पाटील (इरीरींरक्ष झरींळश्र) भाजपच्या वाटेवर आहेत. ते मंगळवारी आपल्या पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा



देणार असून, उद्याच भाजपात प्रवेश करणार असल्याची खात्रीलायक माहिती आहे. धाराशिव जिल्ह्यातील बडे राजकीय प्रस्थ राहिलेले काँग्रेसचे प्रदेश कार्याध्यक्ष बसवराज पाटील यांच्या भाजपा प्रवेशाची चर्चा मागील काही महिन्यांपासून सातत्याने सुरूआहे. अखेर त्यास मंगळवारचा मुहूर्त निघाला आहे. पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यानंतर मंगळवारीच मुंबई येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय राज्यमंत्री भगवंत खुब्बा, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत पाटील भाजपात प्रवेश करणार असल्याची खात्रीलायक माहिती त्यांच्या निकटवर्तियांकडून मिळाली. दरम्यान, धाराशिव लोकसभेची जागा भाजपाला सुटल्यास बसवराज पाटील हे उमेदवारीचे दावेदार असू शकतात. किंबहुना महायुतीचा जो कोणी उमेदवार असेल, त्यास त्यांचे चांगले बळ मिळू शकते. मात्र, पाटील यांनी अशी कोणतीही मागणी, कोणाकडेही केली नसल्याचे त्यांच्या निकटवर्तियांचे म्हणणे आहे.

# मराठवाड्यात काँग्रेसला मोठा धक्का; चव्हाणांनंतर बसवराज पाटलांचा रामराम

**मुंबई :** १२ फेब्रुवारी- काँग्रेसला रामराम, १३ फेब्रुवारी- भाजप प्रवेश, १४ फेब्रुवारी- राज्यसभेची उमेदवारी, १५ फेब्रुवारी- राज्यसभा सदस्य म्हणून बिनविरोध निवड.....हा घटनाक्रम ज्यांच्यासोबत झाला ते म्हणजे राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण.

जे कायम काँग्रेसी म्हणून ओळखले जायचे, ज्यांचे वडील शंकरराव चव्हाण हेदेखील काँग्रेसमध्ये राहिलेत. त्यांचे सुपुत्र अशोक चव्हाण सध्या भाजपाकडून राज्यसभेवर खासदार म्हणून निवडून गेलेत. अशातच मराठवाड्यात काँग्रेसला आणखी एक मोठा हादरा बसला आहे. ते म्हणजे माजी मंत्री आणि काँग्रेसचे प्रदेश कार्याध्यक्ष बसवराज पाटील यांनीही काँग्रेस पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. आणि २७ फेब्रुवारीला म्हणजेच उद्या ते भाजपात प्रवेश करणार असल्याचं कळतंय. चव्हाणांपाठोपाठ आणखी एका नेत्याने पक्षाला रामराम केल्याने काँग्रेसला मराठवाड्यात मोठा धक्का बसल्याचं बोललं जातंय. तरी, चव्हाणांच्या पावलावर पाऊल टाकत काँग्रेसला सोडचिठ्ठी देणारे बसवराज पाटील नेमके कोण आहेत, ते जाणून घेऊयात

एकेकाळी डॉ. पद्मसिंह पाटलांशी ज्यांनी दोन हात केले, माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे मानसपुत्र म्हणून ज्यांची ओळख आहे. ते म्हणजे बसवराज पाटील. धाराशिव जिल्ह्यातील काँग्रेसचे मातब्बर नेते म्हणून ओळखले जातात. मराठवाड्यातील चतुर राजकारण्यांमध्ये त्यांची गणती होते.

बसवराज पाटील हे लिंगायत समाजाचे नेते आहेत. ते मूळचे आधीचा उस्मानाबाद आणि आताचा धाराशिव जिल्ह्यातल्या उमरगा तालुक्यातील मुरूमचे रहिवासी आहेत. राजकीय वर्तुळात बसवराज पाटील हे माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकुरकर यांचे मानसपुत्र म्हणून ओळखले जातात. ते काँग्रेसचे निष्ठावंत मानले जायचे, औसा मतदारसंघातून विधानसभेवर निवडून गेले होते. २००९ आणि २०१४ अशा दोन निवडणुकांमध्ये ते औसा येथून विजयी झाले होते.

१९९९ साली ते उमरग्यातून आमदार म्हणून पहिल्यांदा निवडून गेले. आमदारकीच्या पहिल्याच टर्ममध्ये काँग्रेसने त्यांना राज्यमंत्रीपद दिले होते. मात्र, २०१९ मध्ये अभिमन्यू पवार यांच्याकडून पराभूत झाल्यानंतर बसवराज पाटील हे काँग्रेसमध्ये काहीसे साईडलाईन झाल्याची चर्चा होती. त्यामुळे आता बसवराज पाटील यांनी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देत भाजपची वाट धरल्याचं बोललं जात आहे.

बसवराज पाटील हे धाराशिव लोकसभेसाठी इच्छुक आहेत. परंतु, महाविकासआघाडीच्या जुन्या फॉर्म्युल्यानुसार ही जागा राष्ट्रवादीला जाते. तर, युतीच्या फॉर्म्युल्याप्रमाणे ही जागा शिवसेनेला मिळू शकते. परंतु, लोकसभेसाठी इच्छुक असलेल्या बसवराज पाटलांना पक्षात आणून लोकसभेची उमेदवारी देण्यासाठी भाजप सहकारी पक्षांशी वाटाघाटी करेल, अशी चर्चा आहे.

त्यामुळे आता बसवराज पाटील काँग्रेसला सोडल्यानंतर भाजपातही प्रवेश करणार असल्याच्या चर्चा आहेत. त्यामुळे चव्हाण जसे राज्यसभेवर गेले, तसे आता बसवराज पाटलांचंही लोकसभेचं स्वप्न पूर्ण होतं का हे पाहणं महत्वाचं आहे. कारण, भाजपमध्येच धाराशिवच्या लोकसभेच्या जागेसाठी अनेकजण इच्छूक आहेत. यामध्ये राणा जगजितसिंह पाटील आणि बसवराज मंगरुळे यांचा समावेश आहे. अशावेळी पर्याय म्हणून बसवराज पाटील यांनी औसा विधानसभा मतदारसंघातून लढण्याची तयारीही ठेवली असल्याचं बोललं जातंय. कारण औसा मतदारसंघात लिंगायत समाज मोठ्या प्रमाणावर आहे, '

# शेतकऱ्यांच्या आंदोलनामुळे नाशिककरांची कोंडी

## वन जमिनींच्या प्रश्नावर मंगळवारी मुंबईत बैठक

**नाशिक :** वनहक्क कायद्याची अमलबजावणी, कांदा निर्यात सर्व देशात खुली करावी यांसह विविध मागण्यांसाठी जिल्ह्याच्या विविध भागांतून मजल दरमजल करत आलेल्या हजारो आदिवासी शेतकरी, शेतमजूर, कामगारांनी सोमवारी दुपारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या दिला. डोक्यावर लाल टोपी, हाती लाल झेंडे घेऊन रस्त्यावर ठाण मांडणाऱ्या शेतकऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयास वेढा पडल्याचे चित्र आहे. ठोस निर्णय घेतल्याशिवाय मागे न हटण्याचा निर्धार आंदोलकांनी केला आहे. शिधा घेऊन कित्येक दिवस मुक्काम ठोकण्याच्या तयारीने आलेल्या शेतकऱ्यांमुळे प्रशासकीय यंत्रणाही धास्तावली आहे. या आंदोलनामुळे सोमवारी शहराच्या मध्यवर्ती भागातील वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली.

वेगवेगळ्या भागातून पायी आलेले हजारो शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एकत्र झाले. त्यामुळे मेहेर सिग्नल ते सीबीएस या मुख्य मार्गावरील वाहतूक बंद करावी



लागली. वन जमीन कसणाऱ्या आदिवासी बांधवांची नावे सातबारा उताऱ्यावर लावणे, कांद्याला दोन हजार रुपये क्विंटल हमीभाव व सर्वत्र निर्यात खुली करणे, शेतीसाठी २४ तास वीज पुरवठा, थकीत वीज देयक माफी, घरकुल योजनांच्या अनुदानात वाढ, अंगणवाडी सेविका, मदतनीस, शालेय पोषण आहार कर्मचारी, ग्रामपंचायत डाटा एन्टी ऑपरेटर यांना २५ हजार रुपये किमान वेतन, पूर्वीच्या नदीजोड योजना रद्द करून लहान बंधारे बांधणे आदी मागण्यांकडे माकप आणि किसान सभेतर्फे लक्ष वेधण्यात आले. या मागण्यांसाठी एकदा मुंबईला पायी मोर्चा काढण्यात आला. त्यानंतरही तसेच आंदोलन झाले होते. सरकारने आजवर वेळकाढूपणा केला. आता त्यांची चालबाजी खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा माजी आमदार जे. पी. गावित यांनी दिला.

### वाहतूक विस्कळीत

सकाळपासून वेगवेगळ्या मार्गावरून शेतकरी शहरात दाखल होऊ लागले. पायी मार्गक्रमण करणाऱ्या आंदोलकांमुळे काही भागात वाहतुकीत अडथळे आले. दिंडोरी रस्त्यावर आंदोलकांनी एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे जाण्याचा प्रयत्न केल्याने वाहतूक ठप्प झाली. यावेळी मोर्चेकऱ्यांनी रस्त्यात ठिय्या दिला. त्यांची समजूत काढून काही वेळाने त्यांना मार्गस्थ करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील मेहेर सिग्नल ते सीबीएस या मार्गावरील वाहतूक बंद करावी लागली. सभोवतालच्या इतर पर्यायी मार्गाने वाहतूक करावी लागल्याने मध्यवर्ती भागात सर्वत्र कोंडीचे चित्र निर्माण झाले होते. वाहतूक सुरळीत करताना पोलीस यंत्रणेची तारांबळ उडाली.

### मंगळवारी बैठक

वैयक्तिक वनहक्क धारकांची वनहक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी अभ्यास करून शासनास शिफारस करण्यासाठी शासनाने स्थापलेल्या समितीची तातडीने मंगळवारी दुपारी दीड वाजता बैठक मुंबईतील विधानभवनात होणार आहे. याबाबतची माहिती पालकमंत्री दादा भुसे यांनी दिली. या समितीची आजवर बैठक झाली नसल्याची तक्रार आंदोलकांच्या शिष्टमंडळाने केली होती. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हजारो शेतकऱ्यांनी ठिय्या दिल्याने सरकारला तातडीने दखल घ्यावी लागली. भुसे यांनी स्थानिक स्तरावरील प्रश्न जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना त्वरीत सोडवण्याचे आदेश दिले. त्यात जिल्ह्याला घरकुल योजनेचे उद्दिष्ट कमी असून त्या तुलनेत मागणी जास्त आहे. तर नंदुरबार प्रकल्पात लाभार्थी मिळत नसल्याने तिकडचे घरकुल नाशिक प्रकल्पास देण्याबाबत विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे यांना आदेश दिले.

मागण्या मान्य होत नाही, तोपर्यंत शेतकरी येथून हटणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आदिवासी भागातून हजारो शेतकरी १० ते १५ दिवसांचा शिधा घेऊन शहरात आले असून महिनाभर आंदोलन लांबले तरी हरकत नसल्याचा निर्धार मोर्चेकऱ्यांनी केला. संपूर्ण रस्ता आंदोलकांनी व्यापल्याने जिल्हाधिकारी कार्यालयातील चारचाकी वाहने परिसरात अडकून पडली. सायंकाळी गावनिहाय वर्गवारी करून आंदोलकांनी स्वयंपाकाची तयारी केली. रस्त्यावर चुली मांडून भोजनाची व्यवस्था केली जाणार आहे.

# हमी, आमची जास्त, तुमची कमी!

पंजाबातले शेतकरी किमान आधारभूत किमतीसाठी (एमएसपी) आंदोलन करत असताना केंद्र सरकारने उसासाठी रास्त किफायतशीर दर (एफआरपी) वाढवण्याचा निर्णय जाहीर केला. यातील कार्यकारणभाव सूचक. पंजाबात गहू- तांदूळ प्राधान्याने पिकतो आणि ऊस हे महाराष्ट्र, उत्तर प्रदेशचे पीक. पंजाबात केंद्रीय सत्ताधारी पक्षास काहीही स्थान नाही आणि आगामी निवडणुकांत उत्तर प्रदेश, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या पाठिंब्याची गरज त्या पक्षास आहे. तेव्हा पंजाबातील शेतकरी आणखी चिडले तरी विद्यामान सत्ताधाऱ्यांचे फारसे काही बिघडणारे नाही; पण उत्तर प्रदेश, महाराष्ट्रातील शेतकरी रागावणे परवडणारे नाही. पंजाबातील शेतकऱ्यांस आंदोलन करूनही काही मिळत नसताना, उत्तर प्रदेश, महाराष्ट्रातील बागायती शेतकऱ्यांना न मागताही अधिक दर दिला जात असताना, राजकीयदृष्ट्या संवेदनशील पिकांचे आणि ते पिकवणाऱ्या शेतकऱ्यांचे कोडकौतुक केले जात असताना डाळींकडे मात्र आपले कसे दुर्लक्ष होते हे केंद्र सरकारचाच 'नीती' आयोग दाखवून देतो. गहू, तांदूळ गरजेपेक्षाही अधिक पिकवला जात असताना आपणासमोर तेलबिया-डाळींची टंचाई कशी आ वासून उभी राहणार आहे हे कटू सत्य त्यातून समोर येते. एरवी अन्य कोणी ही बाब मांडली असती तर तीकडे मतलबी वा प्रचारकी म्हणून दुर्लक्ष केले गेले असते. परंतु 'नीती' आयोगच हे सत्य मांडत असल्याने त्यावर भाष्य करणे उचित ठरते.

'नीती' आयोगाच्या अहवालानुसार सध्याच्या गतीने २०४७ पर्यंत आपले कडधान्य उत्पादन ४.७ कोटी टनांवर जाईल. सध्या ते २.३ कोटी टन इतके आहे. म्हणजे आगामी दोन दशकांत त्यात साधारण दुपटीने वाढ होईल. पण ती पुरेशी असणार नाही. याचे कारण आपला आर्थिक विकासाचा दर असाच राहिला तर २०४७ साली आपली डाळींची मागणी ४.९ कोटी टनांवर गेलेली असेल. म्हणजे जवळपास २० लाख टन डाळ आपणास आयात करावी लागेल. यात आर्थिक विकास दराचा मुद्दा महत्त्वाचा कारण अर्थस्थिती सुधारली की नागरिकांचे प्रथिनांचे सेवन वाढते. म्हणजे शाकाहारी अधिक डाळ खाऊ लागतात. याचाच अर्थ असा की सरकार म्हणते त्यानुसार आपली अर्थस्थिती खरोखरच सुधारली तर डाळींची मागणी वाढणार. म्हणजेच देशांतर्गत उत्पादनांत अधिक टंचाई जाणवून अधिक डाळ आयात करावी लागणार. तीच गत तेलबियांची. याच काळात तेलबियांची मागणी ३.१ कोटी टनांवर गेलेली असेल; पण उत्पादन सध्याच्या गतीनेच वाढले तर फार फार तर २.४ कोटी टनांवर जाईल. म्हणजे तेलबियांतील तूट २०४७ साली ७० लाख टनांवर जाईल. त्याच वेळी तांदूळ आणि गहू यांचे उत्पादन हे गरजेपेक्षा जास्त झालेले असेल. सध्या दिल्ली सीमेवर आंदोलन सुरू आहे ते याच दोन पिकांबाबत आणि सध्याच्या सत्ताधीशांचा विरोध आहे तो याच दोन पिकांच्या हमीभावाची हमी देण्यास. आर्थिकदृष्ट्या हा विरोध शहाणपणाचाच यात शंका नाही. तथापि २००६ ते २०१२ या काळात याच हमीभावासाठी कोणी आग्रह धरला ? संघराज्य व्यवस्थेचा उदोउदो न करताही खरे संघराज्यवादी असणारे पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी या आयोगाच्या शिफारशींवर नेमलेल्या मुख्यमंत्र्यांच्या समितीचे प्रमुखपद कोणत्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे होते? मुख्यमंत्रीपदावरून पंतप्रधानपदी बढती मिळाल्यावर आपल्याच मागण्यांचा विसर कोणास पडला? विरोधी पक्षांत असताना हमीभाव हवासा वाटणे आणि सत्ता मिळाल्यावर तो नकोसा होणे या वास्तवात पंजाबातील शेतकऱ्यांच्या आंदोलनाचे मूळ आहे; हे नाकारणार कसे? असो. मुद्दा गहू- तांदूळ आणि कडधान्ये- तेलबियांचा.



वास्तविक आपल्या प्रत्येक सरकारने तेलबिया- कडधान्यांचे उत्पादन वाढावे यासाठी सातत्याने प्रयत्न केले. स्वामिनाथन आयोगाचा अहवाल यायच्या आधी एक वर्ष २००५ साली तत्कालीन मनमोहन सिंग सरकारने 'राष्ट्रीय अन्नसुरक्षा मोहीम' हाती घेऊन डाळींचे उत्पादन २०१२ पर्यंत २० लाख टनांनी वाढवण्याचे लक्ष्य ठेवले. अनेकांस २०१४ पर्यंत देशात काहीही झाले नाही या आभासात सत्य आढळत असले तर २०१२ पर्यंत कडधान्य उत्पादन १.४ कोटी टनांवरून १.७ कोटी टनांवर गेले. म्हणजे अपेक्षेइतकी वाढ त्यात झाली. तथापि २०१४-१५ आणि २०१५-१६ या कालखंडात त्यात २५ लाख टनांनी घट झाली. या काळातील झालेल्या सत्ताबदलास यासाठी जबाबदार धरणे क्षुद्रपणाचे असेल. तसे करणे टाळायला हवे. या कडधान्य उत्पादनातील घसरणीने चिंतित झालेल्या सरकारने त्या वेळी केंद्रीय अर्थसल्लागार अरविंद सुब्रमणियन यांच्या नेतृत्वाखाली यासाठी एक समिती नेमली याचे श्रेय मात्र संबंधितांस देता येईल. कडधान्ये, तेलबिया यांच्या उत्पादनांत कालबद्ध वाढ कशी करता येईल हे सुब्रमणियन समितीने सुचवणे अपेक्षित होते. यासाठी धोरणात्मक पातळीवर काही उत्तेजन द्यावे किंवा काय, याचाही विचार करण्यास सदर समितीस सांगितले गेले. त्यानुसार डॉ. अरविंद सुब्रमणियन यांच्या समितीने 'इन्सेंटिवायझिंग पल्सेस प्रॉडक्शन थ्रू मिनिमम सपोर्ट प्राईस अँड रिलेटेड पॉलिसीज' अशा भारदस्त शीर्षकाचा अहवाल २०१६ सालच्या ६ सप्टेंबरास सरकारला सादर केला. गहू- तांदूळ यांच्यावर भिस्त असलेल्या शेतकऱ्यांनी कडधान्ये, तेलबिया यांची अधिकाधिक लागवड करावी असे सरकारला वाटत असेल तर या पीकबदलासाठी संबंधित शेतकऱ्यांस घसघशीत हमीभावाची हमी देणे आवश्यकच आहे, असे स्पष्ट मत डॉ. सुब्रमणियन समितीचा अहवाल नोंदवतो. देशात कडधान्यांचे उत्पादन वाढावे यासाठी जनुकीय-सुधारित वाणांची लागवड आणि प्रसार केला जावा, अशीही महत्त्वपूर्ण शिफारस डॉ. सुब्रमणियन समितीने केली.

यातील किती शिफारशी अमलात आल्या हा खरा प्रश्न. तो विचारण्यास शरद जोशी यांच्यासारखा सर्वमान्य द्रष्टा कृषीअर्थतज्ज्ञ आज हयात नाही आणि एकूणातच प्रश्न विचारणे आणि त्यांस उत्तर मिळणे जवळपास कालबाह्य झालेले असल्याने या महत्त्वाच्या मुद्द्यांकडे जनसामान्यांचे लक्ष जात नाही. म्हणून सर्व चर्चा राजकीय हेतु-भारित अशीच होताना दिसते. ''पंजाबातील गहू-तांदूळ पिकवणाऱ्या शेतकऱ्यांस कडधान्य लागवडीसाठी उत्तेजन द्यावयाचे असेल तर त्यांना निश्चित दराची हमी देणे आवश्यक आहेच'' असे नमूद करणाऱ्या सुब्रमणियन यांनी आर्थिक साहाय्याच्या बरोबरीने केंद्र-राज्य सलोख्याची गरजही व्यक्त केली होती. शेतीतील बदल केंद्र सरकार एकट्याच्या जोरावर करू शकणार नाही आणि हे काम राज्यांकडूनही स्वत:च्या जोरावर होणारे नाही. राज्यांस केंद्राचे अर्थसाहाय्य लागेल आणि केंद्रात या बदलासाठी राज्यांचा सहयोग आवश्यक असेल, हे सुब्रमणियन यांचे मत किती अचूक होते हे सद्या:स्थितीवरून लक्षात यावे. पीक पद्धतीतील बदल हा एका दिवसात होणारा नसतो. हे संस्कृतीबदलासारखे असते. गहू-तांदूळ पिकवणे ही पंजाबची संस्कृती. भले या अतिपाणीग्रहणी पिकांमुळे क्षार वर येऊन जमिनी नापीक व्हायला लागल्या असतील! पण तरीही त्यात लगेच बदल होणार नाही. या दोन पिकांच्या खरेदीची आणि दराची हमी असल्यामुळे शेतकरी ही पिके अशीच पिकवत राहणार.

कारण या पिकांच्या खरेदीतील राजकारण. त्याचा तपशील सुरुवातीच्या परिच्छेदात आहे. तेव्हा गहू-तांदळाची लागवड कमी करून 'नीती' आयोग दाखवून देतो त्याप्रमाणे कडधान्यांचे क्षेत्र वाढवायचे असेल तर आधी याला झोपवा, त्याला संपवा ही राजकीय वृत्ती सोडावी लागेल. विरोधात असताना हमीभावाचा आग्रह सत्ता मिळाली की सोडायचा हे अयोग्य. 'हमी हमी, आमची जास्त; तुमची कमी' ही चलाखी अंतिमत: अंगाशी येते. पंजाबातील आंदोलन आणि 'नीती' आयोग हेच दाखवून देतो.



ग्रामपंचायत कर्मचारी आंदोलन करताना मान्यवर व कार्यकर्ते. (छाया-अनिल वीर)

## जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे विविध मागण्यासाठी काम बंद आंदोलन

**सातारा :** जिल्ह्यातील कर्मचारी यांचे विविध मागण्यांसाठी दि. २६ ते २९ तारखेपर्यंत काम बंद राहणार आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कामगार सेना यांच्यावतीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

ग्रामपंचायत १०३ अरक्षित जागा गट ड संवर्ग भरती व्हावी. पंचायत राज व्यवस्थेतील स्थानिक स्वराज्य संस्थेत काम काम करणारे ग्रामपंचायत कर्मचारी यांना जि.प.सेवेत सामावून घेण्यात यावे. प्रचलित शैक्षणिक अर्हतानुसार सदर पदे भरली जातात. परंतु गट ड संवर्ग पदभरती दोन वर्षे झाली नसल्याने बहुतांशी कर्मचारी यांची पंचवीस वर्षे सेवा झाली तरी वयाच्या अटींमुळे पदभरती होत नसल्याने त्यांच्यावर अन्याय होत आहे. तरी गट ड संवर्गातील उपलब्ध पदे ग्रामपंचायत कर्मचारी यांच्यामधून भरण्यात यावीत. अशा विविध मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कामगार सेना सलग्न भारतीय कामगार सेना यांच्यावतीने विभाग यांना निवेदन देण्यात आले त्यावेळी प्रभाकर नेवसे. रणजित वरखडे व रमेश भोसले, सोमनाथ भगत. महिला आघाडी प्रमुख वैशाली मोरे. जे.के. काळे.अधिक बडदे,तुषार कुंभार.नामदेव पुणेकर.वर्षा जाधव. अजय वाघ.व सर्व सदस्य तसेच सभासद पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थीत होते.

## कोरेगाव मतदारसंघातील पाच प्रमुख रस्त्यांचा होणार विकास

### ग्रामविकास मंत्रालयाने रस्ता रस्त्यांचा दर्जा वाढविला, ना. महेश शिंदे यांच्या प्रयत्नांना यश

**कोरेगाव :** राज्य विधिमंडळाचे अधिवेशन म्हणजे कोरेगाव विधानसभा मतदारसंघासाठी मोठी पर्वणीच असते. कोरेगाव विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधित्व करत असलेले कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष ना. महेश शिंदे यांनी केलेल्या विशेष प्रयत्नामुळे अधिवेशनाच्या पहिल्या दिवशीच मतदारसंघातील प्रमुख पाच रस्त्यांचा विकास करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. ग्रामविकास मंत्री ना. गिरीश महाजन यांनी त्यास तत्वत: मान्यता दिली आहे. एकूण साडे सत्तावीस किलोमीटर लांबीचे रस्ते आता नव्याने विकसीत होत आहेत. सातारा आणि खटाव तालुक्यातील नागरिकांना त्यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.

राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांचा मोठा विश्वास ना. महेश शिंदे यांच्यावर असून कोरेगाव विधानसभा मतदारसंघातील विकासकामांसाठी त्यांनी नेहमीच झुकते माप दिले आहे. विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर ना. महेश शिंदे यांनी मतदारसंघातील रस्ते विकासासाठी प्रस्ताव ग्रामविकास मंत्री ना. गिरीश महाजन यांच्याकडे सादर केला होता. जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शंभूराज देसाई यांनी या रस्त्यांसाठी खास बाब म्हणून मंजुरी देण्याची शिफारस देखील केली होती. त्यानुसार ग्रामविकास मंत्रालयाने ग्रामीण रस्ते म्हणून रस्ते विकास योजनेमध्ये पाच रस्त्यांचा समावेश केला आहे. या रस्त्यांमुळे ग्रामीण भागाचा खऱ्या अर्थाने विकास होणार असून अनेक वर्ष रस्त्यांपासून वंचित असलेल्या गावांना विकासाच्या मार्गावर येता येणार आहे ना. महेश शिंदे यांनी त्यासाठी विशेष प्रयत्न केले होते.



ग्रामविकास विभागाचे उपसचिव प्रशांत पाटील यांच्या स्वाक्षरीने सोमवारी शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला असून त्यामध्ये ग्रामीण मार्ग क्रमांक २१६ खिंडवाडीमार्गे नवीन एमआयडीसी -कारंडवाडी- देगाव तळेवस्ती -खोलओढा -देगाव - राजेवाडी- निगडी -देवकरवाडी- अपशिंगे हा रस्ता आता ग्रामीण मार्ग म्हणून गणला जाणार आहे. एकूण १२ किलोमीटर लांबीच्या या रस्त्याचे विस्तारीकरण केले जाणार असून मजबूत खडीकरण व डांबरीकरण केले जाणार आहे.

खटाव तालुक्यातील महत्वपूर्ण खटाव -शिंदेवाडी हा तीन किलोमीटरचा रस्ता, खटाव- आमलेवाडी हा पाच किलोमीटरचा रस्ता, विसापूर सावंत वस्ती -रामेश्वर डोंगर हा तीर्थक्षेत्र रामेश्वर देवस्थानकडे जाणारा प्रमुख मार्ग असून पाच किलोमीटर लांबीचा हा रस्ता देखील आता विस्तारित केला जाणार आहे. विसापूर जरग वस्ती ते खातगुण रस्ता देखील आता मोठा होत असून अडीच किलोमीटर लांबीच्या रस्त्यासाठी तरतूद करण्यात आली आहे.

**भाविकांसाठी विशेष सोय**

खातगुण येथे प्रसिद्ध दर्गा असून तेथे हिंदू मुस्लिम समाजाचे लोक दरवर्षी दर्शनासाठी गर्दी करत असतात. भाविकांसाठी खातगुण येथे जाण्यासाठी हा नव्याने रस्ता अस्तित्वात येत असून सातारवरून रहिमतपूर मार्गे आणि कोरेगाव विसापूरमार्गे थेट खातगुणला जाता येणार आहे.

ना. महेश शिंदे यांनी रस्ते मार्गाने मतदारसंघाचा परिपूर्ण विकास करण्याचा ठाम निर्धार केला असून तसे विविध प्रस्ताव सरकारकडे सादर केले आहेत. विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी मतदारसंघाला सरकारने मोठी भेट दिली असून ना. गिरीश महाजन यांनी ग्रामीण रस्ते म्हणून पाच रस्त्यांचा विकास करण्याचा घेतलेला निर्णय हा मतदारसंघाला नवी दिशा देणारा ठरणार आहे, असा विश्वास ना. महेश शिंदे यांनी व्यक्त केला.

## सातारा येथे ईव्हीएम विरोधी जिल्हास्तरीय सर्व पुरोगामी संघटनेचे दि.२९ रोजी आंदोलन

**सातारा :** देशभर ईव्हीएम विरोधी आंदोलने होत असून होऊ घातलेल्या लोकसभेच्या निवडणुका ईव्हीएम मशीनवर न होता बॅलेट पेपरवर व्हाव्यात. अशी मागणी करण्यासाठी जिल्हा ओबीसी संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर गुरुवार दि.२९ रोजी दुपारी बारा वाजता आंदोलन करण्याचा निर्णय कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात घेण्यात आला आहे.

ईव्हीएम बनवणाऱ्या जपान देशांमध्ये बॅलेट पेपरवर मतदान होते.जगात २१३ देशात बॅलेट पेपरवरच मतदान घेतले जाते.मग भारतातच निवडणूक आयोगाचा हट्ट का ? याविषयी सर्वोच्च न्यायालयात राज्य संघटनाद्वारे याचिका दाखल केली जाणार आहे.

ईव्हीएम यंत्राचे षडयंत्र गाढण्यासाठी आम्ही ईव्हीएम ऐवजी बॅलेट पेपरवर मतदान घेण्यात यावे. या न्याय मागणीसाठी हे आंदोलन केले जाणार आहे. निवेदनाची प्रत राष्ट्रपती, पंतप्रधान व निवडणूक आयुक्त यांना पाठवली जाणार आहे.

## दुष्काळी माण - खटाव जनतेच्या वतीने पाण्यासाठी केळीचे वाटप

**वडूज :** सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढली असून दुष्काळी माण -खटाव भाग आता अतिदुष्काळाने होरपळत आहे. त्यांच्या तहानलेल्या घशामध्ये पाणी ओतावे पण आता आश्वासनाची कानात कांडी टाकून त्यांच्या जखमेवर मीठ चोळले जात आहे. त्यामुळे दुष्काळी जनतेने राज्य शासनाकडे पाण्यासाठी केळी वाटपाचा अभिनव कार्यक्रम केला आहे. याची सातारा जिल्ह्यात चर्चा सुरू झालेली आहे.

माण -खटावचे भाजपचे आमदार जयकुमार गोरे व खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर या भाजपच्या जोड गोळीने राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मान्यवरांच्या ती मध्ये भव्य दिव्य आकर्षक कार्यक्रम व बोटिंग कार्यक्रम आंधळी धरणामध्ये केला .

जिहे - कठापूर योजनेतून गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार या योजनेतून जलपूजनाचा इव्हेंट केला. याला अल्प प्रतिसाद मिळाला आहे. कारण, दुष्काळी भागातील जनता शेती व पिण्याच्या पाण्यासाठी गावोगावी संघर्ष करत आहे. शासकीय पातळीवर लक्ष वेधून घेण्यासाठी खटाव तालुका पाणी संघर्ष समितीच्या वतीने खटाव तालुक्यातील वंचित गावांना पाणी मिळावे. या प्रमुख मागणीसाठी खटाव तालुक्यातील जनजागृती बैठक सुरू केलेली आहे. या बैठकीला राजकीय मतभेद विसरून मोठ्या प्रमाणात ग्रामस्थांची गर्दी होत आहे. भुरकवडी, सिद्धेश्वर कुरोली, वाकेश्वर नढवळ, अंबवडे, बनपुरी, वडूज गणेशवाडी, येरळवाडी तसेच माण तालुक्यातही प्रशांत विरकर, संजय भोसले व काही गावातील सरपंच आणि



महाविकास आघाडीचे नेतेगण मंडळी पाण्यासाठी टाहो फोडत आहेत. अनेक ठिकाणी बैठका होत आहेत.

आम्हाला कोणत्याही राजकारणाची गरज नाही. आम्हाला फक्त पाणी मिळावे. यासाठी आम्ही लढा देत आहे. पाण्यासारखा पैसा खर्च करून स्वतःला जलनायक पदवी बहाल करून दुष्काळी जनतेची क्रूर चेष्टा होत आहे. वास्तविक पाहता कोणताही फेटा हा सन्मानाचे चिन्ह आहे. परंतु, पैशाची धुंदी व पैशातून सत्ता.... सत्तेतून पैसा हे गणित ज्यांना जमले आहे. ते सोन्याचाही फेटा घालू शकतात. परंतु, त्यांनी तहानलेल्या माणसाला पाणी देऊन माणुसकी जपली पाहिजे. कारण, आता खटाव तालुक्यातील औंध १६ गावे, पेडगाव -कणसेवाडी येथील सोळा गावे व बिदाल ,वारुगड, मार्डी , वाकी त्याचबरोबर माण तालुक्यातील अनेक गावं ही पाण्यापासून वंचित आहेत. त्यांना टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे.

ही बाब शरमेची असून सुद्धा जल पूजन करून आपण कोणते दिवे लावलेत ? हे दिवसा दाखवण्याचा प्रकार सुरू होत आहे. ही खेदाची बाब आहे. अशा शब्दात खटाव तालुका पाणी संघर्ष समितीचे निमंत्रण विजयकुमार शिंदे, येरळवाडीचे धनंजय चव्हाण,डॉ. महेश गुरव, गणेश भोसले, शहाजीराजे गोडसे , संभाजीराजे गोडसे, योगेश जाधव, अंकुश दबडे, सूर्यभान जाधव, अनिल पवार इम्रान बागवान, लखन पवार व आबासाहेब भोसले, संजय जगताप यांच्यासह अनेकांनी आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या आहेत. आमचा राजकारणा कधीही विरोध नव्हता. खरं म्हणजे दुष्काळ हटवण्याचे काम करण्यामध्ये सिंहाचा वाटा उचलणारे माण- खटावचे माजी आमदार दिवंगत धोंडीराम वाघमारे, दिवंगत सदाशिव पोळ, दिवंगत भाऊसाहेब गुदगे, माजी आमदार डॉ दिलीप येळगावकर यांच्यासारख्या लोकसंग्रह असणाऱ्या नेत्यांनी पायाभरणी केली पण दुर्दैवाने अध्यापही त्याचा कळस निर्माण करू शकलो नाही.

ही मतदार म्हणून अनेकांना खंत वाटत आहे. वास्तविक पाहता प्रत्येक आमदार हा विकास कामे करून लोकांच्या मनामध्ये अधिराज्य निर्माण करतात पण, काही जण हे बॅनरबाजी, पेपर बाजी व डीजे साऊंड सिस्टिम च्या नादातच आहेत. प्रत्यक्षात मात्र परिस्थिती फार भीषण आहे. अजून उन्हाळा आलेला नाही पण, उन्हाळ्यात लोकसभा निवडणुका होत असल्याने मतदारांचा खरा कौल माण - खटाव मध्ये दिसून येणार आहे. ही बाब राज्यकर्त्यांनी विसरू नये. शेती व पिण्यासाठी पाणी मिळावे. या मागणीसाठी खटाव तालुका पाणी संघर्ष समितीने केळी वाटून जनतेला पाणी देण्याची मागणी करा असा संकेत दिलेला आहे. काहींनी तर चक्क केळ खाऊन आंधळे धरणामध्ये साले टाकण्याचा पराक्रम केलेला आहे. त्याची ही चर्चा विनोदी शैलीने होत आहे. खटाव तालुक्यातील वडूज या ठिकाणी अनेक कार्यकर्त्यांनी जलपूजनासाठी जाणाऱ्या ग्रामस्थांना आत्मचिंतन करा. उपाशी असाल तरी केळी खा व तिथे जाऊन पाणी मागा. अशी अभिनव मागणी मागणी करा. असा सल्ला दिला होता. यामुळे या कार्यक्रमाला जाणाऱ्या काहींनी आपल्या गाड्या माघारी वळवून मागणीला पाठिंबा दिला आहे.आणि आपल्या खटाव तालुक्याचा स्वाभिमान कायम केला. त्यांचे डॉ. महेश गुरव व धनंजय चव्हाण यांनी मनापासून आभार मानले आहेत.

## २७ फेब्रुवारी रोजी समर्थभक्त गुरुनाथ महाराज कोटणीस यांचे प्रवचन





**सातारा :** समर्थ रामदास स्वामींनी आपल्या मनाच्या श्लोकामधून मानवी जीवनातील अपूर्णता काय आहे याचे वर्णन अकराव्या श्लोकापासून २७व्या श्लोकापर्यंत सांगितले आहे. आणि हेच श्लोक प्रवचनातून डॉ. अजित कुलकर्णी यांनी निरोपणासाठी घेतले आहेत. सज्जनगड येथील श्री समर्थ सेवा मंडळाच्या दास नवमी महोत्सवाअंतर्गत आपल्या प्रवचन मालेत दोन दिवसीय प्रवचनामध्ये डॉ. अजित कुलकर्णी यांनी या मनाच्या श्लोकावर अतिशय सुरेख निरूपण केले.

आपली अपूर्णता काय आहे हे मनाच्या श्लोकातील अकराव्या ते विसाव्या श्लोकापर्यंत वर्णन असून त्या अपूर्णतेवर उपाय कोणते याचे विवरण २१ ते २७व्या श्लोकावर समर्थांनी केले आहे. समर्थ म्हणतात काय वागा, काय करा, वासना ठेवू नका आणि त्या सुद्धा कोणत्याही प्रकारच्या हे जाणून घेण्यासाठी मनाच्या श्लोकांचा अभ्यास करणे अतिशय गरजेचे आहे. मनाचे गुणधर्म पाहता मन हे खूप चांगले आहे .मात्र ते आपण पकडून ठेवू शकत नाही .आणि मनातून मुक्तही होऊ शकत नाही. मनाला उपदेश करताना समर्थ म्हणतात की, तू रामाला घट्टपणे धर, राम जसे दैवत आहेत तसेच ते नुसते प्रेम नसून शौर्याचे प्रतीक आहे. शौर्य महत्त्वाचे आहे. आणि हे शौर्य तुला त्या रामाच्या ठिकाणी पाहायला हवी राम जो लोकांचा उद्धार करतो आहे याचा विचार आपण करणे गरजेचे आहे .प्रत्येकाला मृत्यू म्हणजेच काळ हा सतावत आहे आणि तो मागे लागला आहे. मृत्यूला सामोरे जाताना कसे जायचे रडत रडत, की आनंदाने हे ठरवण्यासाठी मनाची तयारी झाली पाहिजे .असा उद्देश समर्थांचा होता.

मनाशी आपण कशा पद्धतीने वागावे याबाबत समर्थांनी केवळ समस्या न सांगता त्यावर उपायही सांगितले आहे. समर्थांनी मनाच्या श्लोकात एकूण ३७ विषयांचा पुन्हा उहापोह केला आहे .मनाच्या श्लोकामध्ये दोन प्रकारे त्यांनी समजावले आहे .मन काय करते व त्यावर उपाय काय नुसते म्हणून उपयोग नाही ,असे सांगताना डॉ. अजित कुलकर्णी यांनी श्रीधर स्वामींच्या गोष्टी ज्या प्रत्यक्षात घडलेल्या होत्या त्यांचे विवेचन आपल्या प्रवचनात केले .कोणत्याच वासनेत गुंतायचे नाही ,अगदी देवाच्या दर्शनाची ही वासना नको. कारण ती बंधनाला कारणीभूत ठरते असे सांगून ..वासना चुकवी जन्माची येरझारा ..असे सांगताना समर्थ वाङ्मयातून समर्थांनी खूप चांगल्या प्रकारे अतिशय सोप्या प्रकारे आपल्या मनाच्या आणि वासनेबाबत उकल केली असल्याचे प्रतिपादन केले.

दि.२७ फेब्रुवारी रोजी या महोत्सवात मंडळाचे अध्यक्ष समर्थभक्त गुरुनाथ महाराज कोटणीस यांचे प्रवचन सादर होणार आहे.

# देशात पुन्हा मोदी सरकार येणार ही काळ्या दगडावरची रेघ : उपमुख्यमंत्री अजित पवार

**भोर :** देशात पुन्हा एकदा मोदी सरकार येणार ही काळ्या दगडावरची रेघ आहे. त्यासाठी घड्याळ चिन्ह लक्षात ठेवा व बारामती मतदार संघात लोकसभा निवडणुकीत महायुतीचा जो उमेदवार दिला जाईल त्याला प्रचंड मताने निवडूण दया असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवार (दि.२४) रोजी शिवशंभो लॉन माळेगाव (नसरापूर) येथे आयोजित भव्य शेतकरी मेळाव्यात कार्यकर्त्यांनसह जनतेला केले.



राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर बहुमता च्या जोरावर अजित पवार यांनी पक्ष व चिन्ह मिळवि ल्यानंतर भोर विधानसभा मदारसंघात त्यांनी प्रथमच शेतकरी मेळाव्याच्या माध्यमातून कार्यकर्त्यांशी संवाद साधला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर बारामती लोकसभा मतदार संघात सुप्रिया सुळे यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस चा उमेदवार निवडून आणण्यासाठी अजित पवार यांनी मोर्चे बांधणी सुरु केली असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

सध्या देशात मोदी लाटेचा प्रभाव असून तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी पंतप्रधान होणार असे झालेल्या सर्व्हे नुसार ६५ टक्के लोकांचे मत आहे. त्यामुळे देशात पुन्हा एकदा मोदी सरकार येणार आहे ही काळ्या दगडावरची रेघ आहे असा घाढ विश्र्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

भोर वेल्हा आयोजित शेतकरी मेळाव्यात अजित पवार अनेक विषयावर बोलले पुढे ते म्हणाले की मी कामांसाठी हपापलेला असून बारामती लोकसभा मतदार संघात मोठ्या प्रमाणात निधी देण्याचा प्रयत्न केला आहे. मी जिल्हा बँकेचा ३२ वर्ष अध्यक्ष होतो. मी कामाचा माणूस आहे. मी नेहमीच कडक बोलत असून माझे नाण खणखणीत वाजत. माझ्या पालक मंत्री पदाचा फायदा १३ तालुक्यांना व्हावा याचा मी पुरेपूर प्रयत्न करत आहे.

यावेळी बोलताना अजित पवार म्हणाले की राज्यातील विविध प्रकल्प गुजरातला जात असल्याचे आरोप विरोधकांकडून केले जात आहेत आता महानंद डेअरी देखिल गुजरातला गेल्याचे बोलले जात आहे त्यावर उत्तर करत अजित पवार म्हणाले की महानंद डेअरी कुठे गेली नसून ती गोरेगावलाच आहे तेथे जाऊन पहावे तिथेच दिसेल. विरोधकांना आता बोलायला काहीच राहीले नाही त्यामुळे ते काहीही बोलत आहेत अशी टीका त्यांनी यावेळी केली.

पुढे बोलताना अजित पवार म्हणाले की बारामती लोकसभा मतदार संघात मी मोठ्या प्रमाणात निधी दिला आहे. अनेकांनी या मतदासंघाचे प्रतिनिधित्व केले आहे त्यांची कारकीर्द तूम्ही पाहिलीच आहे. आता योग्य उमेदवार देण्याचं काम महायुती करणार आहे तुमचे पवित्र मत त्यांना द्यायचे आहे. उद्याचा महायुतीचा जो उमेदवार जो कोणी असेल त्याला मतदान करा. त्याची निशाणी घड्याळ असेल. विकासासाठी घड्याळालाच मतदान करा. असे आवाहन यावेळी त्यांनी केले.

रुपाली चाकणकर यांची सुप्रिया सुळे यांच्यावर जहरी टीका...

यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांसह शेतकऱ्यांशी संवाद साधताना रुपाली चाकणकर म्हणाल्या की नाकाने कांदे सोलणाऱ्यानो तुमचे आमच्या दादांशिवाय पान हालत नाही. तसेच बारामती लोकसभा संघातील खासदार दादांमुळेच निवडूण येत होत्या. जहरी अशी टीका सुप्रिया सुळे यांचे नाव न घेता केली.

यावेळी कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पुणे जिल्हा अध्यक्ष प्रदीप गारटकर , महीला अध्यक्षा रुपाली चाकणकर , जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष रणजित शिवतरे , जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विक्रम खुटवड , जिल्हा परिषदेचे माजी सदस्य चंद्रकांत बाठे , पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक भालचंद्र जगताप , तालुका अध्यक्ष संतोष घोरपडे, केदार देशपांडे, गणेश निगडे, स्वप्नील कोंडे, कुणाल धुमाळ, किर्तीताई देशमुख, विद्याताई पांगारे तसेच भोर वेल्हे तालुक्यातील राष्ट्रवादीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकसभा निवडणुकीच्या तयारीसाठी, भारतीय जनता पार्टीच्यावतीने जोरदार तयारी

**राजगुरुनगर :** लोकसभा निवडणुकीच्या तयारीसाठी, भारतीय जनता पार्टीच्या वतीने शिरूर लोकसभा मतदारसंघातील, बूथ अध्यक्ष, शक्ती केंद्रप्रमुख, सुपर वॉरियर्स यांचे संमेलन बुधवार दिनांक २८ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ९.३० वाजता चाकण भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आले असून उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री नामदार ब्रिजेशजी पाठक यावेळी निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेणार आहेत. यावेळी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे तसेच राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील तसेच विधान परिषदेचे आमदार श्रीकांत भारतीय, शिरूर लोकसभेचे भारतीय जनता पार्टीचे लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार महेशदादा लांडगे, प्रभारी राजेश पांडे, प्रदेश उपाध्यक्ष बाळाभाऊ भेगडे, सरचिटणीस मुरलीधर मोहोळ, विक्रांत पाटील, विभागीय संघटन मंत्री मकरंद देशपांडे, यांच्यासह शिरूर लोकसभेतील भारतीय जनता पार्टीचे सर्व नेते आणि पक्षाचे अनेक नेते यावेळी उपस्थित राहणार आहेत.

शिरूर लोकसभेतील जुन्नर , आंबेगाव, खेड - आळंदी, शिरूर - हवेली, भोसरी आणि हडपसर विधानसभा मतदारसंघातील ३००० प्रमुख कार्यकर्ते या वेळी उपस्थित राहणार आहेत. याच दिवशी सकाळी ८.३० वाजता राजरत्न हॉटेल भाम येथे लोकसभा चुनाव प्रबंधन समिती आणि कोर समितीची बैठक आयोजित करण्यात आली असून शिरूर लोकसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टीचे सर्व प्रमुख नेते आणि निवडणूक प्रमुख यावेळी उपस्थित राहणार आहेत. लोकसभा निवडणुकीची रणनीती यामध्ये ठरवली जाणार असून प्रचाराचे नियोजन ठरवले जाणार आहे.

अशी माहिती भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शरद बुट्टे पाटील आणि निवडणूक समितीचे सहप्रभारी राम गावडे ,सदस्य संजय थोरात,प्रिया पवार यांनी दिली.

## चांदुसमध्ये भर दिवसा तरुणावर गोळीबार

**राजगुरुनगर :** राजगुरुनगरजवळील चांदूस (ता. खेड) येथे रविवारी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास दोन व्यक्तींनी एका तरुणावर गोळीबार केला. यामध्ये तरुण जखमी झाला असून, त्याला उपचारासाठी पुण्यातील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

हृषीकेश दिलीप कल्हाटकर (वय २६, रा. चांदूस, ता. खेड) असे गोळीबारात जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चांदूस- कोरेगाव रस्त्यावरून रविवारी दुपारी हृषीकेश जात असताना त्यांच्यावर दोन जणांनी गोळीबार केला. यानंतर आरोपी फरारी झाले. हृषीकेशला तातडीने राजगुरुनगर येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, प्रकृती गंभीर झाल्याने त्यांना पुढील उपचारासाठी पुण्याला हालविण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. भर दिवसा झालेल्या गोळीबारामुळे चांदूस परिसरातील नागरिक हादरले असून, या प्रकरणी अद्याप कुणावरही गुन्हा दाखल झाला नाही; तसेच गोळीबाराचे कारणही समोर आले नाही. राजगुरुनगर पोलिस तपास करीत आहेत. चांदूसमध्ये चार महिन्यांपूर्वी तरुणांच्या भांडणातून एकाचा खून करण्यात आला होता.

# पाटणचा पर्यटन विकास मुख्यमंत्र्यांनी जावलीला पळविला : शंकर मोहिते

**पाटण :** पाटण तालुक्यात पर्यटनसह रोजगार वाढीस मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहेत. आज पाटण तालुका पर्यटनाच्या बाबतीत मागस होत असल्याचे समोर येत आहे. पाटण तालुक्याच्या शेजारील जावली, महाबळेश्वर तालुक्याला तीनशे / चारशे कोठीचे पॅकेज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नेत आसताना पाटण तालुक्यातील पर्यटनच्या वाट्याला केवळ पाच टक्के निधी उपलब्ध होत आहे. हे दुर्दैव आहे. पाटणचा पर्यटन विकास मुख्यमंत्र्यांनी जावलीला पळविला.. अशी खंत पाटण तालुका ट्युरिझम डेव्हलपमेंट असोसिएशनच्या बैठकीत बोलताना पत्रकार शंकर मोहिते यांनी व्यक्त केली.



पाटण तालुका ट्युरिझम डेव्हलपमेंट असोसिएशन चे अध्यक्ष अविनाश महिंदकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी उपाध्यक्ष विकास पाटील, सचिव सुनिल शिंदे, धैर्यशील पाटणकर, पत्रकार विद्या म्हासुर्णेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

शंकर मोहिते पुढे म्हणाले गेल्या दहा वर्षांत पर्यटन विकासाच्या दृष्टीने एक हि मोठा प्रकल्प पाटण तालुक्यात आला नाही. जे होते ते बंद झाले. नवीन महाबळेश्वरच्या प्रस्तावित आराखड्यातील सर्व प्रकल्प जावली, महाबळेश्वरला पळविले जात आहेत. पाटण तालुक्यातील कोयनेचे बोटींग बंद करून जावली तालुक्यातील मुनावळे येथे जागतिक दर्जाचे जल पर्यटन विकसित करण्यासाठी ४५ कोठी रुपये शासनाने मंजूर केले आहेत. तर जागतिक दर्जाचे पर्यटन विकसित करण्यासाठी जावलीतील कोयना जलाशयावरीर ३५० कोटी रुपये पेक्षा जादाचा निधी खर्च करून अहिरे येथे पुलाची निर्मिती सुरु आहे. जावली तालुक्यात स्कुबा डायव्हिंग, बनाना राईड, जेट स्की, हाऊस बोट, बोट क्लब यासह पर्यटकांसाठी अत्याधुनिक सुविधा उभारण्यात येत आहेत. नुकत्याच मुंबई येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत महाबळेश्वर पर्यटन विकासासाठी पुन्हा ३६० कोठी रुपये निधी मंजूर केला गेला आहे. या माध्यमातून पाटण तालुक्यातील पर्यटन विकासाच्या तोंडाला केवळ पाने पुसण्याचे काम सुरु आहे. पर्यटनाच्या माध्यमातून समृद्ध व्हायचे असेल तर स्थानिक लोकांनी पुढे येण्याची गरज आहे.

असे त्यांनी सांगितले.

यावेळी पत्रकार विद्या म्हासुर्णेकर म्हणाल्या पाटण तालुक्यात निसर्गाने मुक्तहस्ताने उधळण केली आहे. इथं काही निर्माण करायची गरज नाही नैसर्गिक रित्या समृद्ध तालुक्यात पर्यटन वाढीच्या दृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आसताना पाटण तालुक्यात पर्यटन निधी येतो पण तो नेमका जातो कुठे हा प्रश्न निर्माण होत असून तो जर सत्कारणी लागला असेल तर तो दिसून आला असता. जावली खोऱ्यातील कोयना जलाशयात मुख्यमंत्री महोदयांच्या स्वप्नातील पर्यटन आराखडा साकार होतोय कोयना नावाने बातम्या येत आहेत परंतु खऱ्या अर्थाने त्याचा पाटण तालुक्याला काहीएक उपयोग नाही. कोयनेचे बँकवॉटर समृद्ध होत आहे मात्र खरी कोयना ओस पडली आहे. तालुक्यातील अनेक प्राचीन देऊळे आहेत त्यांचा जिर्णोद्धार झाला पाहिजे. नैसर्गिक पर्यटन स्थळे आहेत त्यांना निधीची गरज आहे. परंतु तालुक्यातील पर्यटनाला अवकळा आली आहे. कोयनेला धोका म्हणून बाऊ केला मानाईनगरचा बोटिंग टप्पा बंद केला काठी जवळ पॉईंट होणार अशी घोषणा झाली पण गृहविभाग, जलसंधारण, वनविभागा यांच्या हरकती यास आहेत का..? या बोटिंगचा फायदा स्थानिक लोकांना नाही तर मुख्यमंत्री व त्यांच्या ड्रिमप्रोजेक्टला होणार आहे. कोयनेच्या शेजारी जवळपास छोटी धरणे आहेत त्यांचा विकास करुन तिथ पर्यटन उभारणे काळाची गरज आहे. स्थानिक लोकांच्या पारंपरिक गोष्टी, अन्नधान्य, औषधे वनस्पती आणि बरचं काही इथं मुबलक आहे याची विक्री पर्यटनाच्या निमित्त होऊ शकते. एकेकाळी गर्भ श्रीमंत असणारी कोयना मरणयातना भोगत आहे पण कोणाला याचे किंचित ही दुःख दिसून येत नाही. असे शेवटी त्यांनी सांगितले.

# इंडियन युथ काँग्रेस आऊटरिच सेल जिल्हाध्यक्षपदी शेख नौमान नवेद नईम यांची निवड

**हिंगोली :** भाजपा सरकार ने देशात अत्यंत हलाकीची परिस्थिती निर्माण करून ठेवलेली आहे.

अश्या हलाकीच्या परिस्थितीततून देश बाहेर कसा काढावा या साठी सोनियाजी गांधी,मा.खा.राहुलजी गांधी ,मा. खा.मलिक अर्जुन खर्गेजी, मा. प्रियंका गांधी,सह देशातील अनेक पक्ष एकत्रित येऊन इंडिया आघाडी निर्माण करून तसेच मा.राहुलजी गांधी यांनी प्रथम भारत जोडो यात्रा व आज भारत न्याय यात्रा काढून देशात आपला संदेश पोहचवीत आहे.



यात आमचा व सर्व सामान्य जनतेचा दाईत्व बनत आहे कि आम्ही सुद्धा त्या मध्ये हतभर लावावा त्या दृष्टीकोनास नजरे समोर ठेवून जिल्ह्यात काँग्रेस पक्ष मजबूत करण्यासाठी मा.आ.भाऊरावजी पाटील गोरेगावकर यांच्या नेतृत्वा खाली आम्ही सर्वांनी मोठ्या संख्यने काँग्रेस पक्षात प्रवेश घेऊन कामास सुरुवात केलेली आहे

जिल्ह्यात युवकानी जोमाने कामाला लागावे व काँग्रेस पक्ष मजबूत आणि बळकट व्हावा उद्देशाने *मा.आ.श्री. भाऊरावजी पाटील गोरेगांवकर, व काँग्रेस जिल्हाध्यक्ष दिलीपजी देसाई यांनी युवक नेतृत्व म्हणून शेख नौमान नवेद नईम यांची इंडियन युथ काँग्रेस आउटरिच सेल जिल्हाध्यक्षपदासाठी सिफारश केली असता राज्याचे प्रदेश अध्यक्ष डॉक्टर शफिक अहमद,मुंबई यांनी त्यांना नियुक्ती पत्र बहाल केले*

ते नियुक्ती पत्र *मा. आ.भाऊरावजी पाटील गोरेगावकर यांच्या हस्ते शेख नौमान नवेद नईम यांना देऊन त्यांचे स्वागत करून पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आले.*

या वेळी युवा नेते रणजित पाटील गोरेगावकर,शेख नईम शेख लाल,काँग्रेस शहर अध्यक्ष पवन उपाध्याय,अल्पसंख्यांक सेल जिल्हाध्यक्ष साद अहमद, आबेद अली खान जागीरदार, मदन शेळके,रंगनाथ पाटील, शालिक पाटील,शेख बासित, पठाण साजिद खान,सतीश लोणकर,शेख अवेज, शेख नफिस पहेलवान,शेख शाहनवाज हुसेन,शेख अफरोज, रौफ खान, मो आमेर बागबाण, सय्यद गौस,कलीम खान, युसूफ खान,शेख अदनान पहेलवान, शेख फैजान,शेख उबेद, हे उपस्थित होते

# वाई येथील हरिहरेश्वर बँक घोटाळा प्रकरणी शिक्षेची पत्रकार परिषदेत मागणी

**वाई :** दक्षिण काशी असं संबोधणाऱ्या सातारा जिल्ह्यातील वाई येथील हरिहरेश्वर बँक घोटाळा प्रकरणी संबंधित काही आरोप यांना शिक्षा व्हावी. यासाठी गेले दोन वर्ष पाठपुरावा करत आहे. पण, यश मिळत नाही. अशी खंत या घोटाळ्याच्या अनुषंगाने श्री नितीन सावंत यांनी सातारा येथे झालेल्या पत्रकार परिषदेत केलेली आहे. तसेच या बँकेचे संचालक मंडळ इतर जबाबदार व्यक्तींवर दाखल झालेल्या गुन्हा क्रमांक १७६/२०२१ नुसार वाई पोलीस ठाणे या गुन्ह्यांमध्ये गुन्हा करण्यास प्रवृत्त करणाऱ्या व्यक्तीला अटक करावी. अशी मागणी केलेली आहे.

सातारा येथे वाई सोनगीर वाडी येथील रहिवाशी नितीन सावंत यांनी सातत्याने दोन वर्ष पाठपुरावा करत आहेत. तरीसुद्धा त्यांना अद्यापही न्याय मिळाला नाही. याबाबत आर्थिक गुन्हा शाखा व केंद्रीय गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य गृहमंत्री, गृह सचिव ,पोलीस महानिरीक्षक, सातारा पोलीस अधीक्षक अशा अर्धा डझन संबंधित अधिकाऱ्यांना त्यांनी पत्र व्यवहार केले आहेत .त्यांचा रोष हा या बँकेचे कायदेशीर सल्लागार असणाऱ्या व्यक्तीवर असून कायदेशीर सल्लागार हे बँकेचे कर्ज प्रकरण मंजुरी बाबत कायदेशीर बाजू तपासून निर्णय घेतात. त्यामुळे या गुन्ह्यात त्यांचा समाविष्ट करावा असा अर्ज त्यांनी दिला आहे. परंतु त्यांच्या ऐवजी त्यांच्याकडे शिक्षण घेणाऱ्या वकिला विरोधात गुन्हा दाखल केला आहे. बँकेचे व्यवस्थापक तसेच काही संचालक यांना अटक सुद्धा झालेली आहे.

या हरिहरेश्वर बँकेचा पहिला गुन्हा हा ३७ कोटी ४४ हजार रुपयाचा झाला आहे. त्यामध्ये ११२ कर्ज प्रकरण बनावट व बेकायदेशीर असल्याचे माहिती श्री सावंत यांनी दिलेली आहे. काही कर्ज प्रकरणे हे कायदेशीर सल्लागाराच्या नातेवाईकां च्या बाबत असल्यामुळे या गोष्टीकडे फारच गांभीर्याने तपास होत नाही. सर्व फांद्या व खोड कापले जाते पण मुळाला हात घातला जात नाही. असा त्यांनी आरोप केलेला आहे. त्याबाबतची त्यांनी कागदपत्र सातारा येथील पत्रकारांना दाखवून माहितीच्या अधिकारातही त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण माहिती गोळा केलेली आहे.

विशेष बाब म्हणजे संबंधित कायदेशीर सल्लागार म्हणून ज्या व्यक्तीची नेमणूक ठराव क्रमांक दिनांक १५ १५/९/२०११ रोजी केलेली आहे. त्या व्यक्तीला फी अदा केलेली नाही. असे हरिहरेश्वर सहकारी बँकेच्या प्रशासकांनी ८ फेब्रुवारी २०२३ रोजी पत्राद्वारे कळविलेले आहे.

या गुन्ह्यातील पाच आरोपी मयत झाले असून इतर चार आरोपींच्या विरोधात दोषारोपपत्र दाखल केलेले आहे. एकूण आरोपींची ३५ एवढी संख्या आहे तर एका आरोपीला जामीन मंजूर झाल्यामुळे एकदाच ते वाई पोलीस ठाण्यात हजेरी लावून निघून गेल्या असल्याची माहिती श्री नितीन विलासराव सावंत या सोनगिरवाडी येथील व्यक्तीने जन माहिती अधिकारात उघड केलेली आहे. सदर न्यायप्रविष्ठ बाब असल्यामुळे याबाबत संबंधितांनी फारशी माहिती देणे टाळले आहे. दरम्यान ,या प्रकरणाबाबत कायदेशीर सल्लागाराची भूमिका निश्चित करूनच पुढील कारवाई होईल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. दरम्यान याबाबत संबंधित व्यक्तींशी संपर्क न झाल्याने त्यांची बाजू समजू शकली नाही.

# मावळ तालुका खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीत महायुती १६ जागांवर विजयी

**वडगाव मावळ :** मावळ तालुका खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीत महायुतीने १६ जागा जिंकल्या.संघावर एकहाती वर्चस्व मिळवले असेल तरी मातब्बर नेते एकत्र असताना देखील महत्वाच्या असलेल्या अ गटातील तीन उमेदवारांचा पराभव झाला.तर एक जागा अवघ्या काही मतांनी विजयी झाली. ही महायुतीसाठी विचार करायला लावणारी बाब आहे.



मावळ तालुका खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीत महायुतीने १९ जागांपैकी १६ जागा जिंकल्या असल्यातरी मातब्बर नेते एकत्र असताना देखील महत्वाच्या असलेल्या अ गटातील तीन उमेदवारांचा पराभव झाला तर चौथी जागा ईश्वर चिठ्ठीने मिळाली.तर एक जागा अवघ्या मतांनी विजयी झाली. ही निवडणूक राष्ट्रवादी,भाजप व शिवसेना अशी महायुतीने लढवली होती.

निवडणुकी आधीच महायुतीच्या दहा जागा बिनविरोध झाल्या होत्या.उर्वरित नऊ जांगाही बिनविरोध होणे संस्थेच्या हिताचे होते; मात्र हे संस्थेचे हीत न पाहता काहींनी राजकीय पदाच्या लालसेपोटी उमेदवारी ठेवण्याचा हट्ट धरला. त्यामुळेच संस्थेवर निवडणूक लादली गेली, अशी नागरीकांमध्ये चर्चा आहे.

**मतदार संघ व उमेदवार व त्यांना मिळालेली मते पुढील प्रमाणे -**

**सर्वसाधारण अ वर्ग प्रतिनिधी- टाकवे बुद्रूक गट- शिवाजी चिंधू असवले ( ३ विजयी, महायुती ) प्रकाश रामचंद्र देशमुख (0), शांताराम सुदाम लष्करी (३),शिवणे गट- विष्णू गोपाळ घरदाळे ( ४ विजयी),धनंजय एकनाथ टिळे ( ३ महायुती),खडकाळे गट- रमेश रघुनाथ भुरुक ( ४ विजयी),संतोष श्रीपती कोंढरे (२ महायुती),वडगाव गट - निलेश दशरथ म्हाळसकर (२ महायुती),एकनाथ महादू येवले ( ४ विजयी),क वर्ग मतदार संघ (३ जागा ) - माणिक मारुतराव गाडे (८०५ विजयी),किरण दौलत हुलावळे (८१८ विजयी),गणेश मारुती विनोदे ( ७४५ विजयी,सर्व महायुती ),सदाशिव आनंदराव सातकर (३१७), बबन महादू आरडे(१२२), मारुती तुकाराम असवले(५८),अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती मतदार संघ ( १ जागा )- नारायण विष्णू चिमटे(१९२), मधुकर रतिकांत जगताप(८९४ विजयी, महायुती), इतर मागास प्रवर्ग मतदार संघ (१ जागा)- अमोल तुकाराम भोईरकर (५०८ विजयी, महायुती),काळूराम गबाजी थोरवे (४९७),खंडू बाळाजी तिकोने(९१).मतदान व मतमोजणीची प्रक्रिया शांततेत पार पडली.**

शिल्लक नऊ जागांसाठी वीस उमेदवार रिंगणात होते.राज्यात महायुती झाल्यानंतर मावळातील पहिलीच निवडणुक महायुतीच्या माध्यमातून लढवली. ही निवडणूक लागल्यामुळे काही उमेदवारांना कारण नसतानाही पैशांचा मोठाच भुर्दंड पडला.

मावळ खरेदी विक्री संघाच्या १९ जागांपैकी १० जागा यापूर्वीच बिनविरोध झाल्या होत्या. उर्वरित अ वर्गातील चार, क वर्गातील तीन, इतर मागास वर्ग एक व अनुसूचित जाती - जमाती प्र वर्गातील एक अशा नऊ जागांसाठी रविवारी उत्साहात मतदान झाले.

नऊ जागांसाठी २० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. त्यामुळे मतदान केंद्राबाहेर कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाली होती. सायंकाळी चार वाजेपर्यंत अ वर्ग मतदार संघात १०० टक्के मतदान झाले. त्यात टाकवे गटात सहा पैकी सहा,शिवणे गटात सात पैकी सात, खडकाळे गटात सहा पैकी सहा व वडगाव गटात सहा पैकी सहा, क वर्ग मतदार संघात दोन हजार ३२ पैकी एक हजार १०२ ( ५४.२३ टक्के )तर इतर मागास प्रवर्ग व अनुसूचित जाती जमाती मतदार संघात दोन हजार १३३ मतदारांपैकी एक हजार १८१( ५५.३६ टक्के ) मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.मतदानाची वेळ संपल्यानंतर अर्ध्या तासात निवडणूक निर्णय अधिकारी मंदार कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली मतमोजणीला सुरुवात झाली.

सुरुवातीला क वर्ग मतदार संघाची मतमोजणी करण्यात आली. क वर्ग व अनुसूचित जाती जमाती मतदार संघात महायुतीच्या उमेदवारांनी एकतर्फी विजय मिळवला. मात्र इतर मागास वर्ग मतदार संघात मोठी चुरस दिसून आली.

अ वर्गातील टाकवे गटात शिवाजी असवले व शांताराम लष्करी यांना प्रत्येकी तीन मते मिळाल्याने ईश्वर चिठ्ठी टाकण्यात आली. तिचा कौल असवले यांच्या बाजूने लागला. तर इतर मागास प्रवर्गातील पराभूत उमेदवार काळूराम थोरवे यांनी फेर मतमोजणीची मागणी केली. ती मान्य करण्यात आली मात्र निकालावर परिणाम झाला नाही.

# सांगलीतील पाणी प्रश्नावर पालकमंत्री, आमदार गप्प का?, ३ मार्चला ठिय्या आंदोलन

**सांगली :** कृष्णा नदी कोरडी पडत असून सांगली, कुपवाडमधील नागरिकांचे अपुऱ्या व दूषीत पाण्यामुळे हाल होत आहेत. पाण्याचा एवढा गंभीर प्रश्न निर्माण झाल्यानंतरही पालकमंत्री, आमदार, खासदार गप्प कसे बसू शकतात, असा सवाल सर्वपक्षीय कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला. याप्रश्नी तोडगा निघाला नाही, तर येत्या ३ मार्चला पालकमंत्री व आमदारांच्या घरासमोर ठिय्या आंदोलन करण्याचा इशाराही समितीने दिला.



सांगलीच्या 'कष्टकऱ्यांची दौलत' सभागृहात सोमवारी सर्वपक्षीय कृती समितीची बैठक पार पडली. निमंत्रक सतीश साखळकर म्हणाले की, गेले काही दिवस महापालिका क्षेत्रात गढुळ, दूषित व अळीमिश्रित पाणीपुरवठा होत आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असताना गेंड्याची कातडी असलेल्या प्रशासनावर याचा काहीही परिणाम होताना दिसत नाही.

नगरसेवकांची कारकीर्द संपली म्हणून त्यांची जबाबदारी संपली नाही. येणाऱ्या निवडणुकीमध्ये पुन्हा हे नगरसेवक निवडणुकीस सामोरे जाणार नाहीत का? प्रशासन, आमदार, खासदार आणि स्थानिक लोकप्रतिनिधी, विरोधी पक्ष पाणी प्रश्नावर गप्प का आहेत, असा सवाल पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला.

सांगली शहराच्या निम्म्या भागास ७० एम. एल. डी प्रकल्पातून पाणीपुरवठा केला जातो तो शुद्ध व पुरेसा आहे. अर्ध्या शहरास ५६ एम.एल. डीमधून पाणीपुरवठा केला जातो. हा प्रकल्प कालबाह्य झाल्याने दूषीत पाणीपुरवठा होत आहे, अशी माहिती साखळकर यांनी दिली.

कोयना धरणातून कृष्णा नदीत सांगली जिल्ह्याच्या हक्काचे पाणी सोडण्यासाठी वारंवार सातारा पाटबंधारे मंडळ व साताऱ्याचे पालकमंत्री शंभुराजे देसाई यांच्याशी पत्रव्यवहार करावा लागत आहे. धरणातील हक्काच्या पाण्याबाबत योग्य ते धोरण ठरवण्यात यावे, अन्यथा येत्या ३ मार्चला जिल्ह्याचे पालकमंत्री सुरेश खाडे व आमदार सुधीर गाडगीळ यांच्या घरासमोर धरणे आंदोलन करु, असा इशारा देण्यात आला.

बैठकीस माजी आमदार नितीन शिंदे, माजी नगरसेवक जगन्नाथ ठोकळे, पद्माकर जगदाळे, सागर घोडके, हणमंतराव पवार, अशफाक शेख, विश्वजित पाटील, अंकुश केरीपाळे, विजय जाधव, गजानन साळुंखे, उमेश देशमुख, मिलिंद सावंत, किरणराज कांबळे, संजय पिराळे, किशोर जगदाळे, शिवाजीराव सावंत, रेखा पाटील, डॉ. संजय पाटील, संजय चव्हाण, संदीप दळवी, ऋषिकेश पाटील, दिलीप माळी, शुभम पाटील, अजित काशीद, मुस्तफा मुजावर, रुपेश मोकाशी, निलेश पवार आदी उपस्थित होते.

# विकसित भारत संकल्प यात्रेचा २५ हजार नागरिकांनी घेतला लाभ 'मोदी गॅरंटी व्हॅन' उपक्रमाला प्रतिसाद

**सोलापूर :** केंद्र शासनाच्या योजनांचा लाभ देण्यासाठी आलेल्या 'मोदी गॅरंटी व्हॅन' ला शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून 'विकसित भारत संकल्प यात्रेच्या दुसऱ्या टप्प्याचा समारोप काल साईबाबा चौक येथे करण्यात आला. यात्रेदरम्यान शहरातील ३६ ठिकाणी घेण्यात आलेल्या विशेष शिबिरामध्ये सुमारे २५ हजार नागरिकांनी सहभागी होऊन विविध केंद्रीय योजनांचा लाभ घेतला, अशी माहिती उपायुक्त मच्छिंद्र घोलप व क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंकुश चव्हाण यांनी दिली.

केंद्र शासनाच्या वतीने राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांना पर्यत पोहोचावी तसेच त्यांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ शिबिरांच्या माध्यमातून व्हावा या उद्देशाने सुरु झालेल्या या यात्रेदरम्यान ९ हजार ३७८ नागरीकांनी संकल्प प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमाच्या ठिकाणी सोलापूर महानगरपालिकाच्या वतीने प्रधानमंत्री स्वनिधी योजना, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी), आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, उज्वला योजना व आधार कार्ड संदर्भात माहिती आणि प्रत्यक्ष लाभ देण्याकरिता शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये प्रधानमंत्री उज्जवला योजनेचा ७१६ जणांना लाभ देण्यात आला. तसेच १ हजार ३५० नागरिकांना गोल्डन कार्डचे वितरण करण्यात आले. १ हजार ८६६ जणांनी प्रधानमंत्री स्वनिधी योजना आणि ३९२ नागरीकांनी आधार दुरुस्ती व नवीन नाव नोंदणीचा लाभ घेतला. तसेच २ हजार १७५ नागरीकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

'मेरी कहाणी मेरी जुबानी' या उपक्रमांतर्गत केंद्रीय योजनांचा लाभ घेतल्या ४१ लाभार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच ऑडिओ-विडीओच्या माध्यमातून केंद्र शासनाच्या योजनांची माहिती जनतेपर्यत पोहोचवण्यात आली.

सदरील व्हॅनच्या समारोप प्रसंगी क्षेत्रीय प्रचार सहायक अंबादास यादव, कार्यालय सहायक जे एम हन्नुरे, आरोग्य विभागाचे डॉ. बालराज म्हेत्रे, डॉ. अलकुंटे, डॉ.शैलजा जयदीप व नर्स स्टाफ, एनयूएलएमचे राघवेंद्र अलकुंटे, प्रधानमंत्री आवास योजना समाज विकास अधिकारी सिध्दाराम मेंडगुदले, नागनाथ पदमगोंदे, पूजा भूतनाळे, आरोग्य मित्र सुमित जाधव, शशिकांत सकट, महिला व बालकल्याणचे प्रथमेश सदाफुले, प्रमोद बचूवार, घनकचरा व्यवस्थापनचे दामिनी जवळकर, तेजस शहा, स्वच्छता निरीक्षक श्री शेख, वाहन चालक महादेव चिवरे, ऑपेरेटर विजय माळी आदि उपस्थित होते.

# अनाथ मुलांच्या विविध सुविधांसाठी महिला व बाल विकास विभागामार्फत २३ फेब्रुवारी ते ५ मार्चपर्यंत पंधरवडा

**सातारा :** सन २०२३ चे हिवाळी अधिवेशातील लक्षवेधी सुचना क्र.१९३४ च्या चर्चे दरम्यान विधानसभेत अनाथ बालकांच्या विविध मागण्या संबंधित बैठक घेण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते. या अनुषंगाने मंत्री महिला व बाल विकास यांचे अध्यक्षतेखाली बच्चू कडू, विधासभा सदस्य, यांच्या समवेत दि ५ फेब्रुवारी रोजी संपन्न झालेल्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार अनाथ मुलांना आधार कार्ड, रेशन कार्ड, जातीचा दाखला, महाराष्ट्र राज्याचे अधिवास व राष्ट्रीयत्वाचा दाखला व मतदान कार्ड इ. उपलब्ध करुन देण्यासाठी दि.२३ फेब्रुवारी ते दि.५ मार्च २०२४ या कालावधीमध्ये संपूर्ण राज्यात पंधरवडा राबविण्यात येणार आहे.

या अनुषंगाने सातारा जिल्हयातील अनाथ मुलांना आधार कार्ड, रेशन कार्ड, जातीचा दाखला, महाराष्ट्र राज्याचे अधिवास व राष्ट्रीयत्वाचा दाखला व मतदान कार्ड इ. उपलब्ध करुन देण्यासाठी दि.२३ फेब्रुवारी ते दि.५ मार्च २०२४ या कालावधीमध्ये सर्व तहसीलदार कार्यालयामध्ये स्वतंत्रपणे समर्पित कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे.

तसेच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, सातारा यांचे अधिनस्त चाईल्ड हेल्प लाईन कक्षामध्ये जिल्हास्तरावर समर्पित कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. तसेच या कार्यालयाच्या अधिनस्त तालुकास्तरावर पंचायत समिती आवारातील सर्व संरक्षण अधिकारी (क), यांचे कार्यालयामध्ये समर्पित कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे.

त्यानुसार सातारा जिल्हयातील सर्व अनाथ मुलांनी आधार कार्ड, रेशन कार्ड, जातीचा दाखला, महाराष्ट्र राज्याचे अधिवास व राष्ट्रीयत्वाचा दाखला व मतदान कार्ड इ. प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेणेसाठी दि.२३ फेब्रुवारी ते दि.५ मार्च २०२४ या पंधरवडयाच्या कालावधीमध्ये संबंधित तालुक्यातील तहसीलदार कार्यालये, पंचायत समिती आवारात कार्यरत संरक्षण अधिकारी (क) यांचे कार्यालये व चाईल्ड हेल्प लाईन कक्ष, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, सातारा नवीन प्रशासकीय इमारत २ रा मजला, एस.टी.स्टँड शेजारी ता.जि. सातारा येथील समर्पित कक्षाशी संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी वि.अं.तावरे यांनी केले आहे.

## विद्यार्थी साहाय्यक समितीच्या माजी विद्यार्थ्यांचा ३५ वा मेळावा उत्साहात

**पुणे :** वेगवेगळ्या क्षेत्रांत मिळवलेल्या यशाचं कौतुक आणि आज करीत असलेल्या कामाची, मुलाबाळांची माहिती एकमेकांना सांगत, समितीसाठी काही नवे संकल्प करत, एकत्रित स्नेहभोजनाचा आस्वाद घेत मंतरलेल्या आठवणींना उजाळा मिळाला. निमित्त होते, विद्यार्थी साहाय्यक समितीच्या माजी विद्यार्थी मंडळाच्या वतीने आयोजित ३५ व्या माजी विद्यार्थी मेळाव्याचे.

# फलटण येथे आज २६ फेब्रुवारी २०२३ रोजी विविध संघटना, पदाधिकारी व नागरिकांनी मोर्चा

**फलटण -** भिवंडी जि. ठाणे येथील दलित समाजातील अल्पवयीन युवक संकेत भोसले याची क्षुल्लक कारणावरून हत्या केल्याच्या निषेधार्थ, फलटण येथे आज २६ फेब्रुवारी २०२३ रोजी विविध संघटना, पदाधिकारी व नागरिकांनी मोर्चा काढून, संकेत भोसले यांच्या मारेकऱ्यांना कडक शिक्षा व्हावी अशी मागणी केली.



दरम्यान संकेत भोसले याच्या हत्येचा निषेधार्थ विविध संघटनांकडून फलटण बंदची हाक देण्यात आली होती, या आवाहनास फलटण शहरातील अत्यावश्यक सेवा वगळता व्यापारी, लघु व्यावसायिक, टपरीधारक यांनी उत्स्फुर्तपणे आपली दुकाने व व्यवहार बंद ठेवून प्रतिसाद दिला.

विविध संघटनाच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की,भिवंडी जि. ठाणे येथील दलित समाजातील अल्पवयीन युवक संकेत भोसले याची क्षुल्लक कारणावरून निर्घृण हत्या केल्याच्या निषेधार्थ संपूर्ण दलित समाज पेटून येथून उठला आहे.

कॉलेजमधील किरकोळ वादातून हे हत्याकांड झाले आहे, संकेत भोसले या युवकास अपहरण करीत गंभीर मारहाण झाल्याने त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे.

या प्रकरणातील सर्व आरोपीना कड़क शासन झाले पाहिजे, व त्या आरोपींवर मोक्का व U-P- या कायद्यांतर्गत कार्यवाही करून संकेत भोसले यास न्याय मिळाला पाहिजे अशी मागणी फलटण बौद्ध समाजाच्या वतीने सरकार कडे करीत आहोत तरी या भीमसैनिकाला न्याय मिळावा आणि त्याच्या कुटुंबाचे पुनर्वसण करण्यात यावे.

# केंद्र अन् राज्य घरकुलात सातारा विभागात अव्वल

## ७ तालुकेही सर्वोत्कृष्ट




**सातारा :** अमृत महा आवास अभियान ग्रामीणमध्ये सातारा जिल्ह्याने विभागस्तरावर केंद्राच्या प्रधानमंत्री आणि राज्यपुरस्कृत घरकुल योजनेत अव्वल स्थान मिळविले आहे. त्याचबरोबर या योजनांतच जावळी, महाबळेश्वर, कऱ्हाड, सातारा, पाटण, कोरेगाव आणि माण तालुके तसेच चार ग्रामपंचायतीही सर्वोत्कृष्ट ठरल्या आहेत. यामुळे घरकुलमध्येही जिल्ह्याने यशाची परंपरा कायम राखली आहे.

केंद्र तसेच राज्य शासनाच्यावतीने पक्का निवारा नसणाऱ्या विविध समुहातील कुटुंबांना घरकुल योजनेचा लाभ देण्यात येतो. ही घरकुल योजना चांगल्या पध्दतीने राबविण्यासाठी विविध पातळीवर प्रयत्न करण्यात येतात. त्यासाठी पुरस्कारही दिला जातो. तर अमृत महा आवास अभियान ग्रामीण २०२२-२३ सुरू करण्यात आलेले आहे. याचा विभागस्तरीय निकाल जाहीर झाला आहे. यामध्ये पुणे विभागात सातारा जिल्ह्याने सर्वच पातळीवर यशाचा डंका वाजविलेला आहे.

सर्वोत्कृष्ट जिल्हे या प्रकारात प्रधानमंत्री आवास ग्रामीण आणि राज्य पुरस्कृत योजनेत साताऱ्याने प्रथम क्रमांक मिळविला आहे. तर सर्वोत्कृष्ट तालुके प्रकारात प्रधानमंत्री योजनेत जावळी, कऱ्हाड आणि सातारा तालुक्याने अनुक्रमे तीन क्रमांक प्राप्त केले. तसेच राज्य योजनेत महाबळेश्वर तालुक्याने प्रथम तर माणला तृतिय क्रमांक मिळाला. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायतींसाठीही पुरस्कार होते.

यामध्ये प्रधानमंत्री योजनेत कऱ्हाड तालुक्यातील येळगाव आणि पाटणमधील भुडकेवाडीने प्रथम तर पाटण तालुक्यातीलच काठी ग्रामपंचायतीने दुसरा क्रमांक मिळवला. राज्य योजनेत पाटणमधील बोंद्री ग्रामपंचायत प्रथम क्रमांकावर राहिली. शासकीय जागा उपलब्धतेत सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या तालुक्यांना पुरस्कार देण्यात येणार आहे. यामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेत तीनही तालुके सातारा जिल्ह्यातील आहेत. कोरेगाव, सातारा आणि कऱ्हाड तालुक्याने अनुक्रमे क्रमांक मिळविला. तर वाळू उपलब्धतेत सर्वोत्कृष्ट कामगिरीत प्रधानमंत्री आणि राज्य पुरस्कृत योजनेतही पाटण तालुका प्रथम राहिला आहे. या यशाचा गौरव सोहळा दि. १ मार्च रोजी सकाळी ११ वाजता पुणे येथील विभागीय आयुक्त कार्यालातील मुख्य सभागृहात होणार आहे. दरम्यान, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक संतोष हराळे तसेच त्यांच्या टीमने घरकुलात सतत कार्य केले. तसेच लोकांच्या घरकुलाबाबतीतील अडचणीही सोडविल्या. यामुळे जिल्ह्याला मोठ्या प्रमाणात यश मिळाले आहे.

# जिल्ह्यातील बाजार समित्यांमध्ये शुकशुकाट; कोट्यवधींची उलाढाल ठप्प!

**अकोला:** महाराष्ट्र शासनाने कृषी उत्पन्न पणन अधिनियममध्ये प्रस्तावित केलेल्या विधायेकातील सुधारणा शेतकरी, व्यापारी, अडते, हमाल, मापारी व इतर बाजार घटक तसेच बाजार समित्यांच्या अस्तित्वास बाधक ठरणार असल्याचे सांगत बाजार समितीमधील कामगारांनी सोमवार, दि. २६ फेब्रुवारी रोजी कामकाज बंदची हाक दिली होती. या बंदला जिल्ह्यातील बाजार समित्यांमध्ये प्रतिसाद दिसून आला असून, सोमवारीअकोलाकृषी उत्पन्न बाजार समितीसह जिल्ह्यातील पाचही बाजार समित्यांमध्ये शुकशुकाट दिसून आला. दरम्यान व्यवहार बंद असल्याने जवळपास १२ ते १५ कोटी रुपयांची उलाढाल थांबली आहे.महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मध्ये सन २०१८ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६४ अन्वये सुधारणा प्रस्तावित केलेल्या आहेत. प्रस्तावित विधेयकातील सुधारणा या शेतकरी, व्यापारी, अडते, हमाल, मापारी व इतर बाजार घटक तसेच बाजार समित्यांचे अस्तित्वास बाधक ठरणार असल्याने बाजार समितीमधील कामगारांनी सोमवारी कामकाज बंद ठेवणार असल्याचे निवेदन बाजार समितीला दिले होते. शेतकरीही बाजार समितीकडे फिरकले नाहीत. सोमवारच्या एका दिवसाच्या बंदमुळे बाजार समितीत शेतमाल आला नाही. सर्वत्र शुकशुकाट दिसून येत होता. व्यापाऱ्यांचे गाळे बंद होते. फक्त बाजार समिती आवारात यापूर्वी आलेला शेतमाल ठेवलेला दिसत होता. या बंदमुळे शेतकरीही बाजार समितीकडे फिरकले नाहीत. दरम्यान, तुरीची आवक मोठ्या प्रमाणावर झाली असल्याने अकोला बाजार समितीत एका दिवसापूर्वी आलेल्या तूरीचे माप झाल्याची माहिती आहे. दुसरीकडे, अकोट व मूर्तिजापूर बाजार समितीतील व्यवहार ठप्प होते.

# शरद पवार नाही, शेवटचा डाव जयंत पाटीलच टाकतील; भाजप खासदाराचा दावा

**मुंबई :** राष्ट्रवादीचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे समर्थक मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या बालेकिल्ल्यातकाल राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाची जाहिर सभा पार पडली. या सभेतून विविध नेत्यांनी दिलीप वळसे पाटील यांच्यावर हल्लाबोल केला. यावेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्षजयंत पाटीलयांनीही वळसे पाटलांना इशारा दिला. पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली आम्ही अनेक वर्षे काम केले आहे. त्यांचे अनेक डाव आम्ही बघितले आहेत. कोणी तेल लावून तयार आहे असं म्हणलं होतं. वस्ताद हा नेहमी एक डाव राखून ठेवतो आणि तो डाव जेव्हा बाहेर येतो तेव्हा सगळे तेल लावलेले पैलवान चितपट होतात, असं जयंत पाटलांनी म्हटलं होतं.जयंत पाटीलयांच्या या वक्तव्यावरून नगर दक्षिणचे भाजप खासदारसुजय विखेपाटील यांनी जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. सुजय विखेपाटील म्हणाले की, जयंत पाटील हेशरद पवारमहाराष्ट्राच्या राजकारणात शेवटचा डाव टाकतील, असं म्हणतात. मात्र जयंत पाटील हेचशरद पवारांसोबतकिती दिवस थांबणार आहेत, ते आधी विचारुन घ्या. नाही तर शेवटचा डाव जयंत पाटीलच टाकायचे, असा टोला विखेंनी लगावला आहे.मंचरमधील सभेत काय म्हणाले होते जयंत पाटील? राष्ट्रवादीतील फुटीनंतर पुणे जिल्ह्यातील मंचर इथं झालेल्या सभेत अजित पवार गटावर हल्लाबोल करताना जयंत पाटील म्हणाले की, मधल्या काळात काही लोकं पक्ष सोडून गेले. जाताना सोबत पक्षाचे नाव आणि चिन्ह सुद्धा हिसकावून नेले. सुप्रीम कोर्टाने देखील ताशेरे ओढत पवार साहेबांच्या पक्षाला ७ दिवसाच्या आत चिन्ह द्या, असा आदेश निवडणूक आयोगाला दिला. लई विषय उघडला तर लई टोकाला जाईल. आम्ही बोलत नाही कारण आमची संस्कृती संयमाची आहे. शरद पवार साहेब हाच आपला पक्ष आहे, त्यामुळे बाकी गोष्टींची चिंता करायची आपल्याला गरज नाही. शून्याचे शंभर करण्याची ताकद आदरणीय पवार साहेबांकडे आहे. त्यामुळे त्यांना दिल्लीकर देखील दचकून असतात. पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली आम्ही अनेक वर्षे काम केले आहे. त्यांचे अनेक डाव आम्ही बघितले आहेत. कोणी तेल लावून तयार आहे असं म्हणलं होतं. वस्ताद हा नेहमी एक डाव राखून ठेवतो आणि तो डाव जेव्हा बाहेर येतो तेव्हा सगळे तेल लावलेले पैलवान चितपट होतात, असा इशारा पाटील यांनी विरोधकांना दिला.दरम्यान, नैतिकतेचे अधिष्ठान घेऊन काम करणाऱ्यांचे मागे परमेश्वर देखील ताकद उभी करतो. त्यामुळे बूथ कमिटी मजबूत करण्याचे काम करा. घराघरात पोहोचा. समोरून प्रचंड शक्ती तुम्हाला दाबण्याचा प्रयत्न करेल, पण डगमगू नका. महाराष्ट्र धर्म वाचविण्यासाठी, महाराष्ट्राचा स्वाभिमान टिकविण्यासाठी एकजुटीने लढूयात, असं आवाहन जयंत पाटील यांनी आपल्या कार्यकर्त्यांना केलं आहे.




# सांगलीच्या अशुद्ध पाणीप्रश्नावर महापालिका आयुक्तांकडून झाडाझडती

## पाणीपुरवठा विभागाची घेतली आढावा बैठक

**सांगली:** शहरातील अनेक भागात होत असलेल्या अशुद्धपाणीपुरवठ्याच्याप्रश्नावर महापालिका आयुक्त सुनील पवार यांनी तातडीची बैठक घेऊन झाडाझडती घेतली. पाणीपुरवठ्यातसुधारणा न झाल्यास अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

आयुक्त तथा प्रशासक सुनील पवार यांनी पद्मभूषण वसंतदादा पाटील सभागृहात पाणीपुरवठा विभागाच्या सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांची बैठक घेतली. शहरातील पाणीपुरवठ्याबद्दल येत असलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आयुक्तांनी विचारणा केली. पाणीपुरवठा विभागाने शुद्ध पाणी देण्याबाबत केलेल्या उपाययोजनेबाबत अभियंता अजहरअहमद मुल्ला, विशेष कार्यकारी अधिकारी सुनील पाटील, कार्यकारी अभियंता चिदानंद कुरणे यांनी माहिती दिली.



कृष्णा नदीची पाणीपातळी कमी झाल्यामुळे पाणी अशुद्ध होत आहे, असा खुलासा कर्मचारी, अधिकाऱ्यांकडून करण्यात आला. सध्या महापालिकेच्या जलशुद्धीकरण केंद्रावर होत असलेले पाणी शुद्धीकरण चांगल्या पद्धतीने होत असून पाण्यामध्ये कोणत्याही प्रकारचा वास नाही. नदीपासून येत असलेल्या पाण्यामध्ये काही प्रमाणत अशुद्ध घटक मिळून आल्याचे सांगितले. उपायुक्त वैभव साबळे यांनीही पाणीपुरवठा अधिकारी, कर्मचाऱ्यांना सुचना दिल्या. बोगस कनेक्शनधारकांवर कारवाईचा इशाराही त्यांनी दिला. अशुद्ध पाण्यावर तात्काळ उपाययोजना करण्यासाठी तज्ज्ञांची मदत घेऊन पूर्तता करावी, अशी सूचना आयुक्त पवार यांनी दिली. याकामी कोणत्याही प्रकारची हयगय सहन केली जाणार नाही. दोषींवर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा आयुक्तांनी दिला.

## अनाथ मुलांच्या विविध सुविधांसाठी महिला व बाल विकास विभागामार्फत २३ फेब्रुवारी ते ५ मार्च पर्यंत पंधरवडा

**सातारा :** सन २०२३ चे हिवाळी अधिवेशातील लक्षवेधी सुचना क्र.१९३४ च्या चर्चेदरम्यान विधानसभेत अनाथ बालकांच्या विविध मागण्या संबंधित बैठक घेण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते. या अनुषंगाने मंत्री महिला व बाल विकास यांचे अध्यक्षतेखाली बच्चू कडू, विधासभा सदस्य, यांच्या समवेत दि ५ फेब्रुवारी रोजी संपन्न झालेल्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार अनाथ मुलांना आधार कार्ड, रेशन कार्ड, जातीचा दाखला, महाराष्ट्र राज्याचे अधिवास (Domacile) व राष्ट्रीयत्वाचा दाखला (Nationality) व मतदान कार्ड इ. उपलब्ध करुन देण्यासाठी दि.२३ फेब्रुवारी ते दि.५ मार्च २०२४ या कालावधीमध्ये संपूर्ण राज्यात पंधरवडा राबविण्यात येणार आहे. या अनुषंगाने सातारा जिल्हयातील अनाथ मुलांना आधार कार्ड, रेशन कार्ड, जातीचा दाखला, महाराष्ट्र राज्याचे अधिवास व राष्ट्रीयत्वाचा दाखला व मतदान कार्ड इ. उपलब्ध करुन देण्यासाठी दि.२३ फेब्रुवारी ते दि.५ मार्च २०२४ या कालावधीमध्ये सर्व तहसीलदार कार्यालयामध्ये स्वतंत्रपणे समर्पित कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे.